CMYK

दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

u RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▸ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▸ वर्ष ४ थे ▸ अंक : ३४० वा ▸ शुक्रवार दि. ६ ऑक्टोबर २०२३ ▸ किंमत : २ रु. ▸ पृष्ठे : ६

दादा मुख्यमंत्री झाले तर पहिला हार मी घालेन : सुळे

मुंबई । अजित पवार हे भाजपसोबत गेले तेव्हापासूनच अजित पवार हे राज्याचे मुख्यमंत्री होतील, अशी चर्चा होती. खुद्द उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवार राज्याचे मुख्यमंत्री होतील, असं म्हटलं. याबाबत प्रश्न विचारला असता राष्ट्रवादीच्या बारामतीच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी यावर भाष्य केलं. अजितदादा मुख्यमंत्री झाले तर पहिला हार मी घालेन, असं खासदार सुप्रिया सुळे यांनी म्हटलं आहे. त्या आज नांदेडमध्ये आहेत. तिथे त्यांनी माध्यांमांशी संवाद साधला. यावेळी सुळे यांनी उपमुख्यमंत्री फडणवीस यांच्यावरही निशाणा साधला.

न्यूज कॉलम

शिरपूरात चोरट्यांनी दुकान फोडले

शिरपूर । वरचे गाव शिरपूर येथील जैन गल्लीतील वर्धमान ट्रेडींग नावाचे दुकान दि.३ ते ४ ऑक्टोबर दरम्यान चोरट्यांनी फोडले. या दुकानातून ४ लाख ३२ हजार रूपये किंमतीचा मुद्देमाल चोरट्यांनी लंपास केला. अतुल हसमुखलाल पटेल रा.जैन गल्ली, वरचे गाव शिरपूर यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार,महाराजा कॉम्प्लेक्समधील त्यांच्या मालकीचे वर्धमान ट्रेडींग नावाचे दुकान चोरट्यांनी फोडले. चोरट्यांनी दुकानातील ४ लाख ३२ हजार रूपये किंमतीचे तांब्याचे ३५ बंडल लंपास केले.

अधिकाऱ्यास दमदाटी; चौघांविरुद्ध गुन्हा

धुळे । भेसळयुक्त दुधाचा पदार्थ बनविणाऱ्यांवर कारवाई केली म्हणून जिल्हा दुग्धविकास अधिकारी तथा भेसळ निर्मूलन समितीचे सदस्य डॉ. अमित रमेश पाटील यांना दमदाटी केल्याने गुन्हा दाखल झाला. गायीच्या दुधात ०५.५ टक्के भेसळ करून अपायकारक पदार्थ बनविले म्हणून बारकू बुधा पाटील (रा. वाडीभोकर, ता. धुळे) यांच्यावर कारवाई केली. यामुळे बारकू पाटील याच्यासह संदीप बाबूराव पाटील, पुष्पेंद्र रोहिदास पाटील (दोघे रा. गोंदूर, ता. धुळे) व अन्य एका व्यक्तीने डॉ. पाटील यांना दमदाटी केली.

प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे पाण्याचे नियोजन कोलमडले : सभापती किरण कुलेवार

धुळे । प्रतिनिधी

प्रभाग क्र.७ मधील महाले नगर,पद्मनाभ नगरसह अनेक वसाहतींमध्ये गणेशोत्सवाच्या दुसर्या दिवसापासून ते आजपर्यंत जनतेला महापालिकेद्वारे पाणी पुरवठाच झालेला नाही. दररोज दिवसाआड पाणी देण्याबाबत सांगितले जाते. दररोज नको, निदान तीन दिवसाआड तरी पाणी द्या, अशी साद भाजपा नगरसेवक सुनिल बैसाणेंनी प्रशासनाला घातली आहे. तर सभापती किरण कुलेवार यांनी प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे पाण्याचे नियोजन कोलमडले आहे.

आजही माझ्या प्रभागात गढूळ पाणी येत आहे. पद्मनाभ नगरासह इतर वसाहतींमध्ये १२ दिवस उलटूनही पाणी आले नाही. व्हॉल्व सोडल्यानंतर सहा तासानंतर देखील पाणी येत नसल्याबद्दल सभापतींनी संताप व्यक्त केला तर उर्दू माध्यमाचे विद्यालय मराठी माध्यमाचे मदिरालय का झाले असा टोकदार सवाल हर्षकुमार रेलन यांनी प्रशासनाला विचारला. सभेच्या सुरुवातीलाच सुनिल बैसाणे यांनी अक्कलपाडा पाणी पुरवठा योजना आणि त्याद्वारे होणारा दुषीत पाणीपुरवठा,गळती याबाबत सवाल विचारला. पाणीपुरवठा सुरळीत होत नसल्याने जनतेचा आपल्यावर रोष असल्याचे ते म्हणाले. पाणीपुरवठा विभागातर्फे अभियंता सोनवणे यांनी खुलासा करताना सांगितले की, गेले सात-आठ दिवस सुरळीत पाणीपुरवठा होवू शकला नाही. खराब पाण्याचा पुरवठा झाला.ती वस्तुस्थिती आहे. कुसुंबा-नेर दरम्यान अक्कलपाडा जलवाहिनीला गळती लागली. ज्या ठिकाणी जलवाहिनी जोडली जाते. तेथील रबर उन्हामुळे कडक होतो. त्यातुन ही गळती झाली. अक्कलपाड्याचे तीन पैकी दोन पंप सुरु झाले आहे. पाणी आल्यानंतर रहिवाशी वीज मोटारी लावतात. त्यामुळे पाईमध्ये अडकलेले गढूळ पाणी सुरुवातीला येते. आता वॉशआऊट झाल्याने स्वच्छ पाणी येत आहे. सोनवणे यांच्या उत्तराने सभापतींचे समाधान झाले नाही.

प्रशासनाच्या हलगर्जीपणामुळे पाणीपुरवठ्याचे नियोजन कोलमडले. ४ आजही माझ्या प्रभागात वाळू मिश्रीत गढूळ पाणी येते. १२ दिवसांपासून जनतेला पाणी नाही, व्हॉल्वमन एकाचवेळी दोन-तीन व्हॉल्व सोडतो. त्यामुळे दाब कमी होवून पाणीच पोहचत नाही. सुनिल बैसाणे म्हणाले की, अक्कलपाडा योजनेमुळे आधार निर्माण होण्याऐवजी जनता निराधार झाली आहे. पाणी प्रश्नावर प्रशासनाने गंभिर व्हावे ,आमचा कार्यकाळ लवकरच संपेल. आज जनता आम्हाला जाब विचारत आहे. पुढील काही महिन्यानंतर ते तुमच्यापर्यंत पोहचतील. तेव्हा काय असा सुचक इशारा बैसाणे यांनी दिला. नगरसेवक हर्ष रेलन यांनी चर्चेत भाग घेताना सांगितले की, माझे विषय प्रशासनाला नवीन नाही. मी पाठपुरावा करतो. परंतु विषय पुढे सरकत नाही. महापालिकेला शाळा क्र.१४ कडे दुर्लक्ष होत आहे.

आधा शहर अंधेरेमे है...

स्थायी समिती सदस्या नाजीया पठाण यांनी आजच्या सभेत पथदिवे बंद असल्याने आधा शहर अंधेरेमे है... असे म्हणत नाराजी व्यक्त केली. १३ एलईडी पथदिव्यांची मागणी केल्यावर तीन एलईडी पुरविण्यात आल्याचे म्हणत १३ एलईडी पथदिवे कुठेकुठे लावलेत याचा खुलासा करा, अशी मागणी केली. त्यावर श्री.बागूल यांनी लक्ष्मी नगर, सत्संग नगर, शनिनगर आदी भागात हे एलईडी पथदिवे लावल्याचे सांगितले. त्यानंतर मलेरिया संबंधी बैठक होवून देखील प्रभाग तीन मध्ये कमालीची दुर्गंधी पसरल्याने या प्रभागातील खाजगी दवाखाने हाऊस फुल्ल झाल्याचे नाजीया पठाण यांनी सांगितले. गटारी तुंबल्याने डास, मच्छरांचे प्रमाण वाढले आहे. याकरीता वार्डात फवारणी करण्यात यावी, अशी मागणी केली. त्यावर सभापतींनी शहरात कुठेही भेदभाव न करता फवारणी केली जात असून तसे अहवाल माझ्याकडे उपलब्ध असल्याचा खुलासा केला. यानंतर अजेंड्यावरील १७० ते १७५ क्रमांकाच्या विषयांचे वाचन करून ते एकमताने मंजूर करण्यात आले.

डेंग्यूच्या रूग्णांमध्ये दिवसेंदिवस वाढ

प्रभाग तीन मधील गटारी तुंबल्याने मलेरियासह डेंग्यूच्या रूग्णांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असल्याचे सांगत नगरसेविका नाजीया पठाण यांनी आज स्थायी समितीच्या सभेत तीव्र नाराजी व्यक्त केली. तर गेल्या १२ दिवसांपासून स्वतःच्या वार्डात पाणी न आल्याने सभापतींनी नाराजी व्यक्त केली

मला याकामी थोडा वेळ द्या

सभेत अजेंड्यावरील विषय घेण्यापुर्वी सुनिल बैसाणे यांनी पाण्याचा प्रश्न उपस्थित करीत मनपा प्रशासनाला धारेवर धरले. यावर पाणीपुरवठा अधिकारी श्री.सोनवणे यांनी गेल्या काही दिवसांपुर्वी कुसुंबा ते नेर दरम्यान दोन ठिकाणी लागोपाठ समस्या उद्भवल्याने उशिराने व दूषित पाणी पुरवठा झाल्याचा खुलासा दिला. यासह तापी पाणी पुरवठा योजनेच्या पाईपलाईवर देखील समस्या आल्याने उशिराने पाणी पुरवठा झाल्याचे सांगितले. त्यावर सभापती किरण कुलेवार यांनी देखील त्यांच्या वार्डात दुषित व उशिराने पाणी पुरवठा होत असल्याची तक्रार केली. त्यावर श्री.सोनवणे यांनी मी एक महिन्यापुर्वी काामाचा पदभार घेतला असून मला याकामी थोडा वेळ द्या, अशी विनंती केली

वैद्यकीय शिक्षणमंत्री, आरोग्यमंत्री राजीनामा द्या; राष्ट्रवादीचे आंदोलन

धुळे । प्रतिनिधी

ठाण्यातील कळवा रुग्णालयाप्रमाणेच नांदेड, छत्रपती संभाजीनगर, नागपूरसह राज्यातील इतर अनेक शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांचा मृत्यू होण्याच्या घटना घडत आहेत. यास जबाबदार असलेले राज्याचे आरोग्यमंत्री व वैद्यकीय शिक्षक मंत्री यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करत आज राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे हिरे शासकीय रुग्णालयात आंदोलन करण्यात आले. यावेळी रुग्णालयात पहाणी करुन तेथील अस्वच्छता, अपुर्ण औषधसाठा, बंद यंत्रसामग्री या विरोधात संताप व्यक्त केला.

यावेळी रुग्णायाचे अधिष्ठाता यांना विविध मागण्यांचे निवेदनही देण्यात आले. त्यात म्हटले आहे की, राज्यातील आरोग्य यंत्रणेच्या भोंगळ कारभाराला सरकार जबाबदार आहे. सत्ताधीशांना जनतेच्या जीवाची पर्वा नाही. निष्पाप रुग्णांचा बळी गेल्याप्रकरणी राज्याचे आरोग्य मंत्री व वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी राजीनामा द्यावा. धुळ्यातील हिरे वैद्यकीय महाविद्यालय हे धुळे शहराबाहेरील प्रशस्त जागेत स्थलांतरीत झाल्यानंतर सुपर स्पेशलिटी सारख्या आणि पदव्युत्तराचे विद्यार्थी आल्यानंतर अधिक सुविधा रुग्णांना मिळतील अशी लोकांना अपेक्षा होती. परंतु, हे केवळ रेफर सेंटर ठरले आहे. धुळे, नंदुरबार, जळगाव, नाशिक या जिल्ह्यांसह मध्यप्रदेश आणि गुजरात राज्यातील काही भागातील रुग्णू उपचारासाठी येतात. परंतु, हिरे वैद्यकीय महाविद्यालयात सिटीस्कॅन सारख्या सुविधा सुद्धा उपलब्ध नाही. डायलिसिसचे देखील मशीन बंद पडलेले आहे. औषध साठाही पुरेसा नाही. विविध प्रकारच्या मशिनरी खराब होऊन पडलेल्या आहेत. वयोवृद्ध, गर्भवती यांच्यासह सर्वांना दोन ते तीन मजली रोज चढ-उतार करतांना मोठा त्रास सहन करावा लागतो. पिण्याच्या पाण्याचीही गंभीर अवस्था आहे. तरी या समस्यांची तातडीने सोडवणूक करावी, अन्यथा अधिकार्यांना काम करू देणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला. याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष रणजीत भोसले, उषा पाटील, राजू डोमाळे, भिका नेरकर, डी. टी. पाटील, डॉमिनिक मलबारी, हाजी हासिम कुरेशी, असलम खाटीक, मनोज कोळेकर, मंगलदास वाघ, राजेश तिवारी, जयदीप बागल, समद शेख, चेतन पाटील आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

भेसळ तपासणीच्या नावाखाली दूध विक्रेत्यांचा छळ थांबवा

दूध विक्रेते व शेतकऱ्यांचे तहसीलदारांना निवेदन

साक्री । प्रतिनिधी

मागील दोन दिवसांपासून साक्री शहरामध्ये दूध विक्री करणारे शेतकरी व दूध विक्रेते व्यापारी यांच्याकडील संकलित दुधातील भेसळ तपासणीसाठी धुळे येथून पथक आले आहे. दुधात काही रासायनिक किंवा जीवाला अपाय होईल असे पदार्थ मिसळले आहेत किंवा काय यासंबंधी तपासणी सुरू आहे. मात्र दूध विक्रेते व दूध उत्पादक शेतकऱ्यांचा यातून मानसिक छळ होत असल्याचा आरोप करत हा मानसिक छळ थांबवण्याबाबत साक्रीचे नायब तहसीलदार चंद्रकांत शिंपी यांना निवेदन देण्यात आले.

या छळाला कंटाळून आमच्यापैकी कोणी जीवाचे बरे वाईट करून घेतले तर त्यास संबंधित अधिकारी जबाब राहतील असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. सध्याच्या दुष्काळ सदृश स्थितीत गुरांना चारा व पाणी पुरेसे उपलब्ध होत नसल्याने ते उपाशी मरत आहेत. अशा विपरीत परिस्थितीत अन्नभेसळ प्रतिबंधक अधिकाऱ्यांकडून शेतकऱ्यांचा छळ होत आहे. तपासणीच्या नावाखाली होणाऱ्या त्रासाला कंटाळून साक्रीत दूध विक्रेत्यांचा दोन दिवसांपासून संप सुरू आहे. तपासणीच्या नावाखाली होणारा आमचा मानसिक छळ थांबला नाही तर संपूर्ण साक्री तालुक्यात दूध विक्री पूर्णपणे बंद करू असा इशाराही या निवेदनातून देण्यात आला आहे. यावेळी साक्री तालुका प्रमुख पंकज मराठे, हरीश शेवाळे, पंकज देसले, सुमित परदेशी, नितीन सोनवणे, पंकज गवळी, हर्षल शेवाळे, मनोहर पाटील, निलेश घरटे, बाळा घरटे, अमोल गवळी, बाबू माळीच, भूषण ठाकरे, अनिल गवळी, संजय गवळी यांच्यासह बहुसंख्य दूध विक्रेते उपस्थित होते.

जीरेकर नगरात आ.फारुख शाह यांचे हस्ते अभ्यासिकेचे भूमिपूजन

धुळे । प्रतिनिधी

धुळे शहरातील संपूर्ण रस्ते गटार व मूलभूत सोयी सुविधांसाठी आ.फारुख शाह हे प्रयत्न करीत असून त्याला आज पर्यंत यश आलेले आहे.तसेच शहराच्या विकासाबरोबर विद्यार्थ्यांच्या बौद्धिक विकासासाठी शहरात एकूण चार ठिकाणी अभ्यासिका होणार आहे.

शहरातील विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांना तोंड देण्यासाठी व अभ्यास करून स्पर्धा परीक्षांना बसण्यासाठी हे अभ्यासिका महत्वपूर्ण भूमिका निभावणार आहे. धुळे शहरात एकूण चार ठिकाणी अभ्यासिका होणार आहेत. त्यात विटाभट्टी देवपूर साक्री रोड कबीर गंज तसेच जिरेकर नगर येथे अभ्यासिका होणार आहे. दूध डेरी रोड जीरेकरनगर येथे नगरसेवक प्रवीण अग्रवाल यांच्या घराजवळ अभ्यासिकाच्या २५ लाख रुपये कामाचा शुभारंभ आ.फारुख शाहयांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळीस लक्ष्मीबाई गायकवाड, चंद्रकला पाटील, कल्पना देवरे, संदीप जाधव, धडकू पाटील,अमोल जीरेकर, डॉ.शराफत अली, प्यारेलाल पिंजारी, आसिफ शाह, अफसर शाह इंजिनियर, रियाज शाह व परिसरातील प्रतिष्ठित नागरिक उपस्थित होते.

झेंडूच्या लागवडीतून त्याने शोधला उत्पन्नाचा मार्ग

पितृपक्षात १०० रुपये किलो दर

वरूळ । प्रतिनिधी

शिरपूर तालुक्यातील तऱ्हाडी येथील काही शेतकऱ्यांनी झेंडूची लागवड करून उत्पनाचा मार्ग शोधला आहे. रावसाहेब शिवाजी पाटील यांची स्वतःची ३ हेक्टर जमीन आहे. यावर्षी त्यांनी १ हेक्टर क्षेत्रात झेंडूची लागवड केली. तर उर्वरित क्षेत्रावर कांदा, मका, कापूस इतर पिकांची लागवड केली आहे.त्यांना नवरात्राच्या उत्सवात चांगला भाव मिळेल अशी अशा आहे.

मागील वर्षी झेंडूला चांगला दर मिळल्याने त-हाडी येथील काही शेतकरी झेंडू पिकाकडे वळले आहे. शिरपूर तालुक्यातील मोठ्या प्रमाणावर झेंडूचे उत्पादन घेतले जाते. झेंडूच्या जातीनुसार उत्पन्न घेतले जाते. त्यानुसार त्याचे दरही ठरलेले असतात .यावर्षी ज्या आशेने उत्पन्न चांगले घेतले आहे.त्याची पूर्तता या दसऱ्याला चांगला दर मिळून पूर्ण होईल अशी अशा शेतकऱ्यांना आहे. असाच दर असल्यास नक्कीच खर्च निघून चांगल्या प्रमाणात उत्पन्न हातात येईल अशी आशा शेतकऱ्यांना आहे.



किडीमुळे काही प्रमाणात नुकसान

यंदा झेंडूला दर चांगला असतानाही झेंडू फुलावर कीड मोठ्या प्रमाणात पडल्यामुळे शेतकऱ्यांना औषधीचा खर्च मोठ्या प्रमाणात झाला.झेंडूवर पांढरी माशी, मावा, तुडतुडे,त्यामुळे थोड्याफार प्रमाणात उत्पनात घट होऊ शकते.

१ हेक्टर क्षेत्रात रावसाहेब यांना आतापर्यंत १५ हजाराच्या आसपास खरच आला आहे. झेंडूपासून सुमारे तीस हजार रुपयांच्या आसपास उत्पन्न मिळेल अशी अशा आहे. नांगरट, भर लावणे, रोपे, मजुरी (लागवड, तोडणी, भांगलण), रासायनिक खते, कीडनाशके असा सर्व मिळून १, हेक्टर क्षेत्रात १५ हजारच्या आसपास खर्च झाला आहे.

शहरात दोन दुकाने फोडले

धुळे । शहरात चोऱ्यांचे सत्र काही केल्या थांबत नसल्याचे दिसून येते आहे. शहरातील पारोळा रोडवरील रासायनिक खते व बी बियाणे विक्री केंद्र सतीश एजन्सी याठिकाणी मध्यरात्री अज्ञात चोरांनी दुकानाचे शटर तोडून ड्रॉवर मधील १५ हजार रुपये रोख व चांदीचे नाणे तसेच शेजारी असलेले वराडे मेडिकल याठिकाणी शटरचे कुलूप तोडून ड्रॉवर मधील सत ते आठ हजार रोख रक्कम चोरून नेली.

घटनेची माहिती मिळताच आझाद नगर पोलिसांनी घटनास्थळी दाखल होत पाहणी केली. श्वान पथकाने देखील चोरांचा माग काढण्याचा प्रयत्न केला. घटनेची माहिती मिळताच आझाद नगर पोलिसांनी घटनास्थळी भेट देत पाहणी केली. श्वान पथकाने देखील चोरांचा माग काढण्याचा प्रयत्न केला.

शरद पवारांनी ठणकावले : माझ्या अध्यक्षपदाच्या पत्रावर तुमच्याच सह्या आहेत

दिल्ली । प्रतिनिधी

राष्ट्रवादीच्या अध्यक्षपदावर माझी निवड योग्य नाही म्हणता, पण त्या पत्रावर तुमच्याच सह्या आहेत, असं ठणकावून सांगत राष्ट्रवादी पक्ष आणि चिन्हाचा वापर करण्याचा अधिकार फक्त आम्हालाच आहे, असा इशारा राष्ट्रवादीचे अध्यक्ष तथा ज्येष्ठ नेते शरद पवार यांनी अजित पवार आणि त्यांच्या गटाला दिला आहे. निवडणूक आयोगाचा निकाल आपल्याच बाजूने लागेल. मात्र निकाल काहीही लागला तरी चिंता करण्याचं कारण नाही. मी पाच निवडणुका वेगवेगळ्या चिन्हावर लढलो आणि निवडून आलो. चिन्हं बदललं तरी लोक आपला निर्णय बदलत नाही. आपण संघर्षाची भूमिका घेतलेली आहे आणि देशातलंही वातावरण बदलत आहे, असं म्हणत शरद पवार यांनी आपल्या कार्यकर्त्यांमध्ये जान भरली.

राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाच्या विस्तारित कार्य समितीची बैठक आज राजधानी नवी दिल्लीत संपन्न झालीये. दुसरीकडे निवडणूक आयोगात उद्या राष्ट्रवादी कुणाची यासंबंधीची महत्तपूर्ण सुनावणी होतीये. त्याआधी या बैठकीनंतर शरद पवार यांनी पदाधिकारी-नेत्यांना संबोधित केलं. यावेळी त्यांनी अतिशय आक्रमक होऊन अजित पवार गट आणि भाजपला खडे बोल सुनावले. आज अनेक राज्यात भाजपची सरकारे नाहीत. काही राज्यातील विरोधी पक्षाची सरकारं पाडून अनेक ठिकाणी भाजपाने सत्ता स्थापन केली आहे. आता लोकसभेच्या निवडणुका येत आहेत. भाजपने ज्यांच्यावर आरोप केलेत त्यांनाच सोबत घेतलंय. त्यामुळे भाजपने आता त्यांच्या पक्षाचं कमळ हे चिन्ह बदलावं आणि वॉशिंग मशिन घ्यावं. आज आपण अनेक राज्यांवर नजर टाकली तर तिथे भाजप नाहीये. केरळ, पश्चिम बंगाल, पंजाब, ओडिसा अशी उदाहरणे देत देशातलं वातावरण बदलतंय असं सांगून केंद्रात सत्ताबदल होईल, असे अप्रत्यक्षपणे शरद पवार यांनी सांगितले.

चिन्ह बदलले तरी लोक बदलत नाहीत

त्यानंतर आणीबाणी आली. इंदिरा गांधींच्या विरोधात वातावरण होते. त्यांचा पराभव झाला. त्यानंतर पुन्हा चिन्ह बदलले. नवे चिन्ह गाय - वासराचे मिळाले. त्यानंतर पाचवे चिन्ह घड्याळ मिळाले. आता पुन्हा चिन्ह बदलण्याचा प्रयत्न होऊ शकतो. पण चिंता करण्याची गरज नाही. निवडणूक चिन्ह केवळ आधार आहे. चिन्ह बदलले तरी लोक बदलत नाहीत असा माझा अनुभव आहे, असे शरद पवार म्हणाले.

काळजी करण्याचे कारण नाही

यावेळी त्यांनी पक्षाचे निवडणूक चिन्ह गेले तरी काळजी करण्याचे कोणतेही कारण नसल्याचेही स्पष्ट केले. काही लोकांनी पक्षाचे निवडणूक चिन्ह बदलण्याचे कारस्थान रचले आहे. पण घाबरण्याचे काहीच कारण नाही. निर्णय काहीही आला तरी लोक हुशार आहेत. त्यांना बटण कोणते दाबायचे हे चांगले माहिती आहे, असे शरद पवार म्हणाले. यासंबंधी पवारांनी आपल्या राजकीय कारकिर्दीत कधी व केव्हा निवडणूक चिन्ह बदलत गेले याचा अनुभवही सांगितला. मी पहिली निवडणूक लढलो. त्यावेळी मला बैलजोडी चिन्ह मिळाले. त्यावर लढून मी जिंकलो. त्यानंतर ३ वर्षांनी संघर्ष झाला. काँग्रेसची 'काँग्रेस आय' व 'काँग्रेस ओ' या २ गटांत विभागणी झाली. निवडणूक आयोगाने आम्हाला चरखा चिन्ह दिले. तेव्हाही मी जिंकलो.

३१ ग्रामपंचायतींच्या निवडणुका

धुळे । प्रतिनिधी

डिसेंबरपर्यंत मुदत संपणाऱ्या जिल्ह्यातील ३१ ग्रामपंचायतींच्या सार्वत्रिक निवडणुकीचा कार्यक्रम निवडणूक आयोगाने मंगळवारी (ता. ३) जाहीर केला. त्यानुसार निवडणुकीची प्रक्रिया शुक्रवार (ता. ६)पासून सुरू होईल. ५ नोव्हेंबरला मतदान होईल.

जानेवारी ते डिसेंबर २०२३ दरम्यान मुदत संपणाऱ्या जिल्ह्यातील ३१ ग्रामपंचायतींसाठी निवडणूक कार्यक्रम घोषित झाला आहे. यामध्ये चुकीची प्रभागरचना झाल्यामुळे निवडणुका होऊ न शकलेल्या ग्रामपंचायतींच्या सदस्यांसह थेट संरपच पदासाठीदेखील निवडणूक होणार आहे. यात शिंदखेडा तालुक्यातील १३, शिरपूर तालुक्यातील १५ आणि साक्री तालुक्यातील तीन ग्रामपंचायतींचा समावेश आहे. याबाबत शुक्रवारी (ता. ६) निवडणुकीची नोटीस जाहीर होईल. १६ ते २० ऑक्टोबरदरम्यान सकाळी अकरा ते दुपारी तीन यादरम्यान नामनिर्देशनपत्र मागविणे व सादर करण्याची मुदत असेल. २३ ऑक्टोबरला सकाळी अकरापासून उमेदवारी अर्जांची छाननी होईल. अर्ज माघारीची मुदत २५ ऑक्टोबरच्या दुपारी तीनपर्यंत आहे. त्याच दिवशी दुपारी तीननंतर निवडणूक चिन्हवाटप होईल. नंतर ५ नोव्हेंबरला सकाळी साडेसात ते सायंकाळी साडेपाचपर्यंत मतदान होईल आणि ६ नोव्हेंबरला मतमोजणी होऊन निकाल घोषित करण्यात येतील.

राजकीय अनास्थेचे बळी

राज्यातील सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टरांपासून औषधांपर्यंत सर्व गोष्टींची कमतरता आहे; आणि ती एका रात्रीत निर्माण झालेली नाही. सार्वजनिक आरोग्याकडे प्रदीर्घ काळापासून होत आलेले दुर्लक्ष हे त्यामागचे महत्त्वाचे कारण. नांदेड येथील डॉ. शंकरराव चव्हाण शासकीय रुग्णालयात ३६ तासांत ३१ जणांचा मृत्यू झाल्यानंतर या मुद्द्यावरून होत असलेले राजकारण किंवा खडबडून जागे झालेली यंत्रणा म्हणजे तात्कालिक प्रतिक्रिया म्हणता येईल. ऑगस्टमध्ये ठाणे येथील महापालिका रुग्णालयात एका रात्रीत १८ जण दगावल्यानंतरही असेच राजकीय आरोप-प्रत्यारोपांचे राजकारण झाले होते आणि यंत्रणाही (तात्पुरती) खडबडून जागी झाली होती. परिस्थिती सुधारण्यासाठी पुढे फार काही घडले नाही. तसे झाले असते, तर नांदेडमधील दुर्घटना घडलीच नसती. नांदेडनंतर आता छत्रपती संभाजीनगरमध्ये घाटी रुग्णालयात २४ तासांत असेच अनेक मृत्यू झाले आहेत. या दुर्घटनेतही अनेक बालके आहेत. 'शासकीय रुग्णालयात रुग्ण अत्यवस्थ झाल्यानंतरच दाखल होतात, एरवीही रोज पाच-सहा रुग्ण दगावतातच; सध्या तिथे साथींचा फैलाव झाल्यामुळे मृतांची संख्या वाढली आहे,' अशा शब्दांत नांदेडच्या रुग्णालयातील वरिष्ठांनी सारवासारव केली असली आणि हलगर्जी किंवा औषधांच्या कमतरतेमुळे हे मृत्यू झाले नसल्याचा दावा केला असला, तरी त्यामुळे वस्तुस्थिती बदलत नाही. नांदेडच्या रुग्णालयात पुरेशा सुविधा नसल्याच्या नागरिकांच्या तक्रारी आणि तांत्रिक कारणांमुळे औषधांची आणि साहित्यांची खरेदी रखडल्याच्या बातम्या या सरकारी दाव्यांना छेद देतात. केवळ नांदेडमध्येच नव्हे, तर बहुतेक शासकीय रुग्णालयांमध्ये हीच स्थिती आहे. आता पालकमंत्र्यांनी, वैद्यकीय शिक्षणमंत्र्यांनी किंवा प्रमुख विरोधी नेत्यांनी नांदेडला धाव घेणे स्वाभाविकच; परंतु याच तत्परतेने त्यांनी सर्व शासकीय रुग्णालयांतील कमतरता दूर करण्यासाठी आणि डॉक्टरांच्या रिक्त जागा भरण्यासाठी पावले उचलावीत. अन्यथा आणखी एखादी अशी दुर्घटना घडली, की अशीच धावाधाव होईल. शोकसंदेश येतील आणि पहिले पाढे पंचावन्न सुरूच राहतील.

नांदेडच्या रुग्णालयात आता तज्ज्ञांचे पथक चौकशीसाठी जाणार आहे. या चौकशीतून दुर्घटनेमागील कारण समोर येईलही; परंतु जो मूळ आजार आहे, तो बरा करण्याच्या उपाययोजना या समितीने सुचवायला हव्यात. नांदेडच्या रुग्णालयासाठी औषधे आणि साहित्य खरेदीसाठी चार कोटी रुपयांची मंजुरी जिल्हा नियोजन समितीने दिली होती. मात्र, ती तांत्रिक अडचणींत अडकली. तिथे 'वर्ग तीन' आणि 'चार'ची पदे मोठ्या प्रमाणावर रिक्त आहेत. राज्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयात डॉक्टरांची ३० टक्के पदे रिक्त आहेत. हे गेल्या पंधरा वर्षांपासूनचे चित्र आहे. वैद्यकीय शिक्षण विभागाकडून मागणी करूनही सामान्य प्रशासन, अर्थ विभाग लक्ष देत नाही. पदोन्नती, सेवेसाठी पात्र असूनही पदे भरली जात नाहीत. त्याचा परिणाम रुग्णसेवेवर होतो. सहायक प्राध्यापक,अधिव्याख्यातांची पदे कंत्राटी पद्धतीने भरली जातात. एखादा बंधपत्रित उमेदवार आला की कंत्राटी सेवा समाप्त केली जाते. त्यामुळे बढत्या रखडतात. वैद्यकीय शिक्षणसारख्या महत्त्वाच्या खात्याचे प्रमुखपद प्रशासकीय अधिकाऱ्याकडे दिले जाते. त्यांना या क्षेत्राचा अजिबात अनुभव नसतो. त्यामुळे वैद्यकीय शिक्षण संचालक, सहसंचालकांची अवस्था 'लिपिका'सारखी झाली आहे. पूर्वी औषधी खरेदीचे दहा टक्के अधिकार स्थानिक अधिष्ठात्यांना होते. आता ते प्रमाण ३० टक्के केले; पण ७० टक्के औषधी खरेदीसाठी महामंडळ स्थापलेले नाही. वैद्यकीय सुविधांचा अभाव आणि रिक्त पदांबाबत खासदार इम्तियाज जलील यांनी उच्च न्यायलयाच्या खंडपीठात याचिका केली होती. न्यायालयाच्या सूचनेनंतर काही जुजबी बदल सरकारने केली. मात्र, ठोस कारवाई झाली नाही. राज्यात सर्वत्र कंत्राटी पद्धतीने भरती केली जात असून, त्यामुळे आरोग्य सुविधेचे मात्र तीन तेरा वाजत आहेत. खासगीकरणाचा घाट, कंत्राटी पदभरती यामुळे राज्यातील सर्व शासकीय वैद्यकीय महाविद्यालये व रुग्णालयांची अवस्था बकाल झाली आहे. राज्यातील वैद्यकीय शिक्षण विभागातील आरोग्य सुविधा, वैद्यकीय शिक्षण दर्जेदार करावयाचे तर राजकीय हस्तक्षेप थांबायला हवा. प्रत्येक जिल्ह्यात शासकीय वैद्यकीय महाविद्यालय किंवा 'आपला दवाखाना' यांसारख्या लोकप्रिय घोषणा करून सार्वजनिक आरोग्य सुविधा सुधारत नाही. त्यासाठी प्रत्यक्षात गुंतवणूक करावी लागते. समाजातील गरीब आणि वंचित घटक शासकीय रुग्णालयात येतो; कारण खासगी रुग्णालयात जाणे त्याला परवडत नाही. या वर्गाला उत्तम दर्जाची आरोग्य सुविधा देणे ही सरकारची जबाबदारी आहे. त्यासाठी शासकीय रुग्णालयात तज्ज्ञ डॉक्टर, कुशल मनुष्यबळ, अत्याधुनिक वैद्यकीय सुविधा आणि मुबलक औषधे असणे आवश्यक आहे. तरच आरोग्य यंत्रणा भक्कम होईल.

पर्यावरणाची हानी कशी रोखणार?

अमली पदार्थांची तस्करी, बनावट औषधे, खाद्यपदार्थांचा व्यापार, लहान मुलांची आणि महिलांची तस्करी, जुगार आणि सावकारी या जशा गुन्हेगारीशी निगडित बाबी आहेत, तसेच पर्यावरणाशी संबंधित गुन्हे या यादीत तिसऱ्या क्रमांकावर आहेत. त्यातून गुन्हेगार बक्कळ पैसा कमावत आहेत. गुन्हेगार पर्यावरणाची हानी करून पैसे गोळा करत आहेत. त्याच वेळी पर्यावरणाचे संरक्षण करणाऱ्यांच्या हत्या करण्याचे प्रमाण वाढले आहे.

मेझॉनचे जंगल हे जगातील सर्वात मोठे 'रेन फॉरेस्ट' आहे. जगाला मिळणाऱ्या एकूण ऑक्सिजनपैकी २० टक्के ऑक्सिजन येथून येतो. याला पृथ्वीचे फुप्फुस असेही म्हणतात; पण गेल्या दशकभरात या फुप्फुसांचे झपाट्याने नुकसान झाले. नुसती जंगले तोडली गेली नाहीत, तर तिथे राहणाऱ्या वस्त्याही नष्ट केल्या गेल्या. विरोध करणाऱ्यांना मारले गेले. या लाकडांची तस्करी जगातील विकसित देशांमध्ये केली जात होती. असे गुन्हे सातत्याने घडत आहेत. यामध्ये छोट्या टोळ्या नसून संघटित गुन्हेगारी गट काम करतात. याला 'इकोसाइड' म्हणजेच पर्यावरणाची हत्या म्हटले जात आहे. खुनाला शिक्षा असते. मग पर्यावरणाची हत्या करणाऱ्यांना शिक्षा का होत नाही? झाडे तोडताना किंवा नद्यांमध्ये घाण टाकताना मानवावर तसेच संपूर्ण पर्यावरणावर परिणाम होत आहे. या तर्काने जगभरातील पर्यावरण कार्यकर्ते एकत्र येत आहेत. युद्धगुन्हा आणि नरसंहाराप्रमाणे 'इकोसाइड'लाही गुन्ह्याच्या श्रेणीत ठेवावे, अशी त्यांची मागणी आहे. 'इकोसाइड' हा शब्द अमेरिका-व्हिएतनाम युद्धात प्रथम वापरला गेला. अमेरिकेने व्हिएतनामच्या नद्या आणि जमीन प्रदूषित करण्यासाठी एक विशेष प्रकारचे विषारी तणनाशक पसरवले. इंटेलिजन्सच्या भाषेत त्याला 'एजंट ऑरेंज' म्हटले जात होते. अमेरिकेने शत्रू देशाला पराभूत करण्यासाठी त्या देशाच्या मातीत आणि पाण्यात विष टाकले होते. पर्यावरणीय गुन्हा ही एक विस्तृत श्रेणी आहे. त्यातील पहिला वन्य जीव गुन्हा आहे. यामध्ये झाडे आणि जंगलात राहणारे प्राणी या दोघांचेही नुकसान होते. बेकायदेशीर खाणकामही गुन्ह्यामध्ये मोडते. बेकायदेशीर मासेमारी आणि प्रदूषण पसरवणे हे पर्यावरणाच्या विरोधात केल्या जाणाऱ्या कारवायांच्या श्रेणीत येतात. या सगळ्यांना मिळून 'इकोसाइड' म्हणतात.

कचऱ्याची बेकायदेशीर विल्हेवाट लावणे हा पर्यावरणीय गुन्हा आहे. त्याद्वारे गुन्हेगार भरपूर पैसा कमावत आहेत. यामध्ये सामान्य 'बायोडिग्रेडेबल' कचरा तसेच सिरिंज, सदोष इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि खराब झालेली औषधे यांचा समावेश होतो. त्यांची योग्य प्रकारे विल्हेवाट लावणे महत्त्वाचे आहे, जेणेकरून ते पृथ्वी किंवा प्राण्यांना इजा करणार नाहीत. प्रत्येक देशात यासाठी योग्य मार्गदर्शक तत्त्वे आहेत; परंतु पैसे वाचवण्यासाठी गुन्हेगारी संघटना हा कचरा बेकायदेशीरपणे उचलतात आणि इतर देशांमध्ये टाकतात. फिलिपिन्स, घाना, नायजेरिया, व्हिएतनाम, पाकिस्तान आणि बांगलादेशमधून अशा अनेक तक्रारी आल्या की, विघटन न करता येणाऱ्या कचऱ्याचे डोंगर

उभे राहात आहेत. 'युनायटेड नेशन्स एन्व्हायर्नमेंट प्रोग्राम' (यूएनईपी) नुसार, सुमारे १२ अब्ज डॉलर किमतीचा बेकायदेशीर कचरा दर वर्षी केवळ अमेरिकेतून तस्करी केला जातो. इंटरपोलने २०१८ मध्ये कबूल केले होते की, कचऱ्याच्या तस्करीच्या प्रत्येक शिपमेंटमधून तस्करांना लाखो डॉलर्सचा फायदा होतो. यामध्येही प्लास्टिकचा कचरा सर्वाधिक आहे. श्रीमंत देशांनी त्यांचा कचरा गरीब देशांमध्ये सोडू नये, यासाठी आंतरराष्ट्रीय करारावर स्वाक्षरी करण्यात आली. त्याला 'बेसल कन्व्हेन्शन' असे नाव देण्यात आले. १९८९ पासून आतापर्यंत १८८ देशांनी याला सहमती दर्शवली आहे. कचऱ्याची तस्करी थांबवण्याबरोबरच कचऱ्याची विल्हेवाट आणि नियंत्रणाचाही यात समावेश आहे; मात्र या कराराने फारसा फरक पडला नाही.

हे पाहता २०१९ मध्ये आणखी काही सुधारणाही करण्यात आल्या. यानंतरही गरीब देश श्रीमंत देशांसाठी डस्टबिन ठरले आहेत. कचऱ्याची योग्य विल्हेवाट लावणे खूप महाग असल्याने सरकारेदेखील याकडे अनेकदा डोळेझाक करतात. शिपमेंट सुलभ करण्यासाठी अनेकदा कचऱ्याला उत्पादनाचे नाव दिले जाते. सामान्यतः तस्कर यासाठी अवैध मार्ग शोधतात, जेणेकरून माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी सहज पोहोचू शकेल; मात्र काही वेळा प्रकरण अडकते. २०१९ मध्ये नायजेरियामध्ये एक शिपमेंट पकडण्यात आले. त्यात चार हजार टन विषारी कचरा होता; परंतु त्याला खत असे नाव देण्यात आले. जागतिक धोरणानुसार, हा कचरा कुठून आला हे शोधता आले नाही. ते जप्त करून नष्ट करण्याचा संपूर्ण भार नायजेरियन सरकारवर पडला. युरोपियन युनियनचे सदस्य देशही याबाबत बोलू लागले आहेत. लवकरच पर्यावरणाविरुद्धचे गुन्हेही गंभीर गुन्ह्यांच्या श्रेणीत येतील. त्यांना आंतरराष्ट्रीय स्तरावर शिक्षा होईल. गुन्ह्याचा शोध घेण्यासाठी 'इकॉलॉजिकल डिटेक्टिव्हची' ही नेमणूक केली जाईल. भारतात 'इकोसाइड'वर वेगळा कायदा नाही. येथे जगण्याच्या अधिकारांतर्गत प्रत्येक नागरिकाला शुद्ध हवा आणि पाणी मिळायला हवे, असे मानले जाते. शिवाय, भारतीय राज्यघटनेच्या कलम ४८-अ मध्ये म्हटले आहे की, पर्यावरणाचे म्हणजे जंगले, वन्य प्राणी आणि जलचरांचे संरक्षण सुनिश्चित करणे ही सरकारची जबाबदारी आहे. अशा परिस्थितीत कोणामुळे काही अडथळे निर्माण झाल्यास दोषींना शिक्षा होऊ शकते; पण अशी प्रकरणे क्वचित घडतात. जंगलाचे नुकसान करण्यासाठी कोणतीही कठोर शिक्षा किंवा दंड नाही.

एकीकडे ही स्थिती असताना पर्यावरणाचे संरक्षण करणाऱ्या किंवा पर्यावरण रक्षणासाठी लढणाऱ्यांचा बळी घेण्याच्या घटना जगात वाढत आहेत. 'ग्लोबल विटनेस' नावाच्या लंडनस्थित 'एनजीओ'ने आपल्या ताज्या अहवालात पर्यावरण कार्यकर्त्यांच्या हत्येच्या घटना जगभरात कशा वाढल्या, यावर प्रकाश टाकला आहे. २०१९ मध्ये जंगले आणि पृथ्वी वाचवण्यात गुंतलेल्या २१२ संरक्षकांची हत्या करण्यात आली. गेल्या वर्षाच्या तुलनेत हे प्रमाण ३० टक्के जास्त आहे. मारले गेलेले सुमारे ४० टक्के कार्यकर्ते या भागातील जमिनीचे पारंपरिक मालक आणि स्थानिक रहिवासी होते. या सर्व हत्यांपैकी एक तृतीयांशपेक्षा जास्त खून एकट्या लॅटिन अमेरिकेत झाले आहेत. ६४ हत्यांसह कोलंबिया पहिल्या क्रमांकावर आहे. पृथ्वीवरील जमीन मर्यादित असल्याने वाढत्या लोकसंख्येसह या मर्यादित स्रोतावरील वाददेखील वाढत आहेत. त्यामुळेच अनेक भागांमध्ये मूळ रहिवासी आणि तेथील पारंपरिक समुदायांना त्यांच्या भूमीतून काढून टाकण्यासाठी सर्वतोपरी प्रयत्न केले जातात. अशा अनेक समुदायांचे नेते या पारंपरिक क्षेत्रांचे संरक्षण करण्याचा प्रयत्न करतात; परंतु त्यांच्यावर हल्ला होण्याचा धोका खूप जास्त आहे. बऱ्याच प्रकरणांमध्ये, स्थानिक अल्पसंख्याकांनी एखाद्या क्षेत्रातील खाणकाम, जंगलतोड किंवा कृषी व्यवसाय योजनांना विरोध केला आणि त्यासाठी त्यांना मोठी किंमत मोजावी लागली. ज्या लोकांवर हल्ले केले गेले, तुरुंगात टाकले गेले किंवा स्मिअर मोहिमेला बळी पडले त्यांची संख्या खूप जास्त असेल.

२०१९ मध्ये 'नेचर जर्नल'मध्ये प्रकाशित झालेल्या एका अहवालात या हत्यांशी संबंधित मोठ्या प्रवृत्तींवर प्रकाश टाकण्यात आला. त्यात लिहिले होते की, २००२ ते २०१७ या १५ वर्षांमध्ये सुमारे १,५५८ पर्यावरण रक्षक मारले गेले. म्हणजेच दर आठवड्याला असे चार कार्यकर्ते मारले गेले. हत्येतील केवळ दहा टक्के आरोपींना शिक्षा झाली. २०१९ मध्ये फिलिपिन्स, ब्राझील, मेक्सिको, रोमानिया आणि होंडुरास या पाच देशांमध्ये सर्वाधिक कामगार मारले गेले आहेत. राष्ट्राध्यक्ष दुतेर्ते यांच्या राजवटीत फिलिपिन्समध्ये अशा प्रकारच्या हत्या मोठ्या प्रमाणात वाढल्या. २०१८ मध्ये किमान ४६ पर्यावरणवाद्यांची हत्या करण्यात आली. त्यात २६ जण असे आहेत, जे एका कृषी व्यवसाय प्रकल्पाला विरोध करत होते. प्रत्यक्षात पर्यावरणाचे रक्षण करण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना दहशतवादी म्हटले गेले. ब्राझीलचे अध्यक्ष जैर बोल्सोनारो यांनी देशात मोठ्या प्रमाणावर खाण प्रकल्प आणि कृषी व्यवसायाला अतिशय आक्रमकपणे प्रोत्साहन दिले आहे. यामुळे, मेझॉन प्रदेशातील स्थानिक रहिवाशांच्या पारंपरिक जमिनींवरील झाडे तोडण्याचे प्रमाण ७४ टक्क्यांनी वाढले आहे. 'ग्रीनपीस'च्या म्हणण्यानुसार, जंगल माफिया दर तासाला या मौल्यवान जंगलातील सुमारे तीन हेक्टर जमीन नष्ट करत आहेत. आतापर्यंत या हत्यांप्रकरणी कोणालाही शिक्षा झालेली नाही. हा आंतरराष्ट्रीय पातळीवरील महत्त्वाचा विषय मानला जण्याची गरज आहे.

- भास्कर खंडागळे

या दुनियेत असताना माणूस आपल्या जीवनात अनेक प्रकारची कार्य करतो. वास्तविक पाहता त्याची जास्त कार्य स्वतःसाठीच असतात, परंतु मानवा द्वारे केल्या जाणाऱ्या सर्वात श्रेष्ठ कार्या मध्ये एक कार्य आहे- दुसऱ्यांची सेवा करणे. सर्व संत-महापुरुष म्हणतात की द्या,द्या आणि द्या. परंतु आपण आपल्या जीवनात असं पाहतो की बरेचसे लोक देण्यासाठी घाबरतात, कारण की ते चिंता करतात की जर त्यांनी दुसर्यांना काही दिलं, तर त्यांच्याकडे उणीव होईल. परंतु जेव्हा कधी ही आपण निष्काम भावनेने देतो, तेव्हा आपण आपणाला न मागता, बरंच अधिक प्राप्त होते आणि आपण कधी ही तोटात राहत नाही.

सेवा-एक मोठे बक्षीस - संत राजिन्दर सिंह जी महाराज

जीवनात अशे बरेच प्रसंग येतात, जेव्हा आपल्याला एखाद्या गरजवंताला काही मदद करण्याची संधी अर्थात दुसऱ्यासाठी काहीतरी करण्याची संधी मिळते. जेव्हा आपण असे करतो, तेव्हा आपल्याला एक तर ते आपल्याला परत मिळते अथवा परिस्तिथी बदलून जाते आणि आपल्याला काही घेण्याची आवश्यकता राहत नाही. जेव्हा आपण दुसऱ्यासाठी काही त्याग करतो, तेव्हा आपल्याला आत्म-समाधानाचा अनुभव होतो. याच बरोबर आपण स्वतः वर परमेश्वराच्या कृपेच्या वर्षावाचा अनुभव करतो. तेव्हा आपण परमेश्वराची कृतगयता मानतो, कारण आपण स्वार्थी बनण्या ऐवजी इतरांना साहाय्य करण्याचा निर्णय घेतला.

जर आपण स्वार्थी बनलो, तर आपण बऱ्याचदा स्वतः विषयी खेद आणि पश्चाताप ग्रस्त होतो आणि नेहमी ग्लानी ने भरलेले राहतो की आपण असे केले नाही. जरी आपल्याला दिल्या मुळे आपल्याला कधी ही खेद जाणवत नाही. जेव्हा आपण एखाद्याची मदद करतो, तेव्हा आपण या दुनियेत पुरस्कृत होतो, तेवढच नव्हे, दुसऱ्या दुनिये मध्ये सुद्धा आपणाला त्याचे फळ प्राप्त होते. दुसऱ्यांना काही दिल्यामुळे जी प्रसन्नता आपणास मिळते, ती कशातच नाही, जी आपणाला प्रेम आणि आनंदाने ओत-प्रोत करते. जे लोक निस्वार्थ भावनेने देतात, ते याचा अनुभव करतात की असे केल्याने त्यांचे काही ही नुकसान होत नाही, त्या ऐवर्जी त्यांच्या वर परम पिता परमेश्वरचाची अधिक कृपा होते आणि त्यांचे हृदय दिव्य प्रेमाने ओत-प्रोत होते.

विश्वविख्यात परम पूजनीय संत राजिंदर सिंह जी महाराज यांचे देवळाली,जिल्हा नाशिक येथे दिनांक १२ व १३ ऑक्टोबर २०२३ रोजी शुभ आगमन होत आहे. त्यानिमित्त दर्शन, सत्संग आणि नामदान कार्यक्रम कॅन्टोन्मेंट ग्राउंड,आनंद रोड, देवळाली येथे आयोजित केला आहे.

शब्दकोडे-१९६

आडवे शब्द - १. रावसाहेब रामराव – अर्थात गृहमंत्री आबांचे नाव ६. पोलिसांवरील अधिकारी ९. ही धरून लगडी घालतात ११. छिद्र, जखम १२. जय पराजय १४. घोंगड्या विणणारी जमात १६. मोठा हातोडा १७. रम्य दृश्य १९. धमनी २१. मला २४. उपहास २५. शरीर २७. खरकट्याचा ढीग २९. श्रीकृष्णाचे एक नाव ३१. वचक, भीती ३२. हिंदीत शरीर ३३. बारीक झिणझिण ३५. वाक्बगार ३७. अभिमन्यूला ठार मारणारा ३९. फायदा ४०. दहा अब्ज ही संख्या ४१. लाज ४३. रसाळ ४५. मूळ अर्थ शहाणा, सुंदर आणि प्रचलित अर्थ शहरी ४६. जाणे-येणे, वहिवाट ४८. पायताण ४९. सीतेची जुळी मुले ५१. खदक ४३. '--- रे झूठ मत बोलो, खुदा के पास जान है' ५४. पौराणिक आयुध ५५. ओझी उचलणारा ५७. सत्त्व ५९. जोखीम ६१. वाई-महाबळेश्वरमधील प्रसिद्ध घाट ६२. पोहणे ६४. गवताचे रुंद पान ६५. निवासस्थान ६६. मत देणारा ६८. उत्पन्नातील सरकारी हिस्सा ६९. भित्रा, पळ काढणारा ७०. कुलीन ७२. जाणकार ७५. पालव ७७. ढोग ७९. रक्तवाहिन्या ८०. जमीनदार ८१. कमीतकमी, निदान एवढे तरी!

उभे शब्द - १. संरक्षण २. बाहेरच्या विरूद्ध ४. धरणातील पाणीसाठ्याचा प्रदेश ५. छोटी ६. सैनिक ७. जपणे ८. आवड ९. घट्ट, तणावाची स्थिती १०. उष्ण १३. प्रजा १५. दृष्टीभेट १६. गर्द, गच्च १८. वेगाने २०. शीतपेय २२. सोनिया गांधी यांचे दिल्लीतील निवासस्थान या मार्गावर आहे २३. खरे तर हे काही जेवण नव्हे! २६. सापाला कधी धाकला म्हणू नये आणि याला आपला! २८. माज ३०. आवाज, गोंगाट ३४. डोळ्यात तेल घालून करण्याचे काम ३५. विनाश ३६. राजालाही इथे नतमस्तक व्हावे लागते ३८. मृत्यूचा राजा ४१. संभवनीय ४२. पारशी जनतेचा वर्षारंभ दिन ४४. नूतन ४७. माळी, बागवान ५०. काढलेली खोडी ५२. जाडसर पीठ ५३. सर्व ५४. मारुती, भीम ५५. हिंदुस्थानी ५६. उपस्थित ५८. उत्सवाचे दिवस ६०. च्या बद्दल ६३. तरतूद ६४. साडी ६५. जात्याचा आवाज ६६. मधुमक्षिका ६७. शील, उदारता ६८. गव्हाचे बारीक पीठ ६९. पुन्हा ७१. नवरा ७३. नवरत्नांपैकी एक ७४. खेडे ७६. फितुरी ७७. भूपती ७८. माळ, हार



शब्दकोडे १९५ चे उत्तर

आडवे उत्तर - १.खळखळाट ४.नराधम ७.आराम १०.मळकट ११.उभार १३.साव १५.अवाजवी १६.कव १७.पाडा १९.साम २०.वरचेवर २१.रया २३.टवटवीत २६.तप २८.सान २९.बदक ३०.वरवरचे ३३.नालंदा ३५.गमक ३७.कानस ३९.गरगरणे ४२.अवहेलना ४३.रमा ४५.राजकुमार ४६.समरस ४८.वटवट ५०.रजनीनाथ ५३.समस्या ५५.नवागत ५७.अमर ५८.रानटी ६०.जवळ ६१.परवानगी ६३.कापा ६५.पातक ६८.वाटप ७०.रामायण महाभारत ७२.गर ७३.परवा ७४.रबाळ ७५.ताई ७६.रखमाई ७७.इतराजी

उभे- १.खडसावणे २.बळ ३.तलवार ४.नरवीर ५.धमक ६.मळवट ७.आटपाटनगर ८.मग ९.करमणूक १२.भास १४.वर १५.अवयव १८.डावी २२.यातना २४.वसा २५.तबक २५अ.चाचे २७.पलंग ३०.वनराज ३१.रस ३२.रमावर ३४.दार ३६.मणेर ३८.हलकट ४०.गजर ४१.एकनाथ ४२.अमावस्या ४४.मानिनी ४५.राणी ४६.सटवाई ४७.सर ४८.वतन ४९.वन ५१.जहाज ५२.नाठाळ ५३.समर ५४.मरवा ५६.तणतण ५७.अपरंपार ५८.रागीट ५९.टीका ६२.नवार ६४.पारावार ६५.पायजामा ६६.कमळ ६७.सतरंजी ६९.पपई ७१.भाकीत ७२.गळ

सोभाव (सुत्र १४)
मनना चंचलपना

डॉ.रा.प्र.पारनेरकर

मानूसना मनना चंचलपना.ज्यानाबद्दल खुपचगाजावाजा आतापर्यंत व्हयेल शे.तो मनना धर्म नै, मानूसना तो वैचारिक आंगचोरपनाना परिनाम शे.तशाछ काही परिनाम त्याना भौतिक जीवनक्रमा बी शे.जव्हय जी गोष्ट समोर येस तव्हय ती बरीच वाटस.आनी नंतर एखादी त्यामाहीन चांगली गोट समोर उनी ते मंग हाऊ तिबाक पटकन आकर्षित व्हस.एकच टाईमले गनज गोष्टी समोर उन्यात ते त्यानामा कोनती चांगली यानी निवड का करताना तो बावचडस.कारन समोर उनी ती चांगली आनी देत त्याना ईकारी मनले नित्य जीवनक्रमले लागेल -हास.समोर अनुभव ह्या एकथून एक असा चांगला वा वस्तू जगमा -हातीस पन तीना बद्दल ज्ञान आपूनले आते माहीत -हात नै.आसी जानीव निरमान व्हस. आनी तिना विरूद्ध मनवर अशा संस्कार व्हस की मन कौनत्याच गोष्टी समा पूर्ण पने लागत नै.आनी म्हनीसन ते जास्ती टाईम एकच गोटवर स्थिर -हात नै.आपला ज्ञानेद्रिंये यां पाच परकारना नै ते ईषयबी न्यारा न्यारा असा शेतस.त्या परमाने हरेक इषयनी प्राप्ती -हवामुये इंद्रियेसनी तृप्तीव्हस.नै ते नै.असा परकापना -हावामुये देहयष्टी मुये मन फाकस. पन हाऊ त्याना दोस -हात नै. ते जसं फाकस तसं ते एककल्ली व्हस.पन सोताना मनकरता एखाद ठिकान निरमान करन हाई ईचारस्न काम शे.पन लगेच या बाबतमा ईकआरच आपलावर ताबा बसाडथस.ईकार हाऊच इंद्रियाना खरा धर्म शे.तव्हय कोनताबी ईकार हाऊ जास्त टाईम टिकी -हात नै.कारन इंद्रिये एवढा ताकदवार (सक्षम)नैत.त्यासनीक्षमता हाई भलतीच मर्यादा म्हा शे.तव्हय ईकारले केंद्रीत व्हयेल मन जर ईषय वासना वरथून उडी गये ते हाऊ दोष कोन्हा व्हईन.या बाबतमा मन हाई ईनाकारन बदनाम व्हस.सर्वसाधारन मानूसना जीवनम्हा ईचारस्न थोडंसं स्थान -हावामुये त्याले ईकारन केंद्रीत व्हवामुये मननआच जो अनुभव -हास आनी वरना कइरनमउयए ते जास्त टाईम पर्यंत एकच ठिकाने कायम -हाऊ शकत नै.याना अनुभव बी -हाथ नै.एवढाच -हास त्यामुये मानूसन मन चंचल शे असा तो समंजस कौनत्याच भावना नै ते शास्त्रना ईचारम्हा मन आयुष्यभर रमस आनी ते इथल,रमस ते इंद्रिये व्यापार व्हवाले जेवढी त्यानी गरज पडस तेवढी सुद बी मनले -हात नै.तव्हय मन हाई जशी चंचल नै ते त्याले योग्य ते काम देता येवानी वैचारिक लायकी आनी शारीरिक धमक हाई मानूसले नसामुये हाऊ सोताना मनले चंचल बनाडस,त्यामुये मन बिनताकदन व्हस जास मन जेवढं बीनताकदन व्हस तेवढं ते जास्ती चंचलव्हस जास.नै ते मननाएवढी ताकद दुसराना -हात नै.आनी दुसरी मजा हाई शै की मनना धर्म हाऊ आज्ञाधारकमा शे.तेबंडखोर नै.

– प्रा.भगवान पाटील. अध्यक्ष, अहिरानी साहित्य परिषद धुळे

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
नंदुरबार कार्यालय - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

खा. सिंह यांना ईडीने अटक केल्याच्या निषेधार्थ 'आप'ने काढली सरकारची प्रतिकात्मक शवयात्रा

नाशिक । प्रतिनिधी

अंमलबजावणी संचालनालयाने आम आदमी पार्टीचे राज्यसभा खासदार संजय सिंह यांच्या घरावर छापेमारी केली. दिल्ली सरकारच्या मद्य धोरणासंदर्भात चौकशीसाठी हा छापा टाकण्यात आला होता. या छापेमारीनंतर सलग १० तास संजय सिंह यांची चौकशी करण्यात आली. त्यानंतर त्यांना अटक करण्यात आली. या निषेधार्थ नाशिकच्या आम आदमी पार्टीतर्फे सरकारची प्रतिकात्मक शवयात्रा काढण्यात आली.

या अटकेविरोधात आम आदमी पार्टी नाशिकने केंद्र सरकारची जिल्हाधिकारी कार्यालयासमोर प्रतिकात्मक शवयात्रा काढून केंद्र सरकार आणि ईडी विरोधात घोषणा देत जाहीर निषेध नोंदविला. यावेळी मोठ्या संख्येने नागरिकही उपस्थित होते. तसेच आपचे राज्य संघटन मंत्री नविंदर अहलुवालिया, राज्य मीडिया प्रमूख चंदन पवार, पदाधिकारी स्वप्निल घिया, योगेश कापसे, शुभम पडवळ, विकास पाटील, अभिजीत गोसावी, पद्माकर अहिरे, अनिल फोकने, प्रदीप लोखंडे, नूतन कोरडे, अनिल कौशिक, प्रभाकर वायचळे, कलविंदर गरेवाल, अल्ताफ शेख, अमित यादव, सुमित शर्मा, अमर गांगुर्डे, प्रमोदीनी चव्हाण, निर्मला दानी, शांताबाई बनकर, मिना अग्रवाल, भूषण पाटील, दिपक सरोदे आदी कार्यकर्ते उपस्थित होते.

ईडी फक्त नरेंद्र मोदींच्या सांगण्यावरून काम करीत आहे, त्यांनी आपली स्वायत्तता सोडून मोदींची गुलामगिरी पत्करली आहे. अशा संस्थेबद्दल जनतेला आता कुठलाही विश्वास उरलेला नाही. कारण ईडी ही आपले काम सोडून सांग काम्यासारखी झालेली आहे.

- नविंदर अहलुवालिया

आम आदमी पार्टी वेगाने वाढत असल्यामुळे त्यांच्या शीर्ष नेत्यांना जेलमध्ये टाकून पार्टी कमजोर करण्याचा प्रयत्न नरेंद्र मोदी सतत करीत आहेत. कुठलेही भरभक्कम पुरावे नसताना आम आदमी पार्टीच्या नेत्यांना जेलमध्ये टाकण्याची ही पद्धत म्हणजे मोदींची राजकीय अपरिपक्वता आणि खुनशी प्रवृत्ती दिसते आहे.

- चंदन पवार

आम आदमी पार्टीने म्हटले आहे की, खा.संजय सिंह यांच्या घरातील वस्तू ईडी कडून अक्षरशा कचऱ्या सारख्या फेकून देण्यात आल्या, संजय सिंह यांच्या परिवाराला सुद्धा त्रास देण्याचा प्रयत्न करण्यात आला ही अटक म्हणजे नरेंद्र मोदींनी ईडीला पुढे करून बदला घेण्याची चुकीची मानसिक प्रवृत्ती आहे. दिवसेंदिवस आम आदमी पार्टीच्या प्रामाणिक लोकांना जेलमध्ये टाकण्याचा जो घाट मोदी सरकारने घातला आहे तो लोकशाही विरोधी आहे असा आरोप आप'ने केला आहे.या निषेधार्थ नाशिकच्या आम आदमी पार्टीतर्फे सरकारची प्रतिकात्मक शवयात्रा काढण्यात आली.

युवक राष्ट्रवादी, मदत फाउंडेशनतर्फे अत्यल्प दरात हरभरा डाळीचे वाटप

चणाडाळ अवघी ६० रुपये किलो

नाशिक । प्रतिनिधी

केंद्र सरकार व नाफेड यांच्या संयुक्त विद्यमाने राबविल्या जाणाऱ्या योजनेअंतर्गत जनतेला सणासुदीच्या काळात स्वस्तात चणाडाळ मिळावी यासाठी युवक राष्ट्रवादीचे शहराध्यक्ष व मदत फाउंडेशनचे संस्थापक अंबादास खैरे यांनी उपक्रम राबवला. यात ग्राहकांना त्यांनी अवघ्या ६० रुपये किलो दराने चणाडाळ दिली आहे. यामुळे नाशिक शहरातील ग्राहकांना दिलासा मिळाला आहे.

'भारत डाळ' या नावाने किलोभर चणाडाळ अवघ्या ६० रुपयांत उपलब्ध करून देण्यात येत आहे. पंचवटी येथील अंबादास खैरे यांच्यातर्फे त्यांच्या संपर्क कार्यालात २००० किलो डाळीचे वाटप करण्यात आले. केंद्र शासनाकडून 'भारत डाळ' या नावाने सर्व सामान्य गोरगरीब जनतेस परवडेल अशा दराने चना डाळीची विक्री सुरु केली आहे. १ किलो बॅगसाठी ६० रुपये प्रतिकिलो या अनुदानित दराने वाटप करण्यात येत आहे. पंचवटी परिसरातील महिला व नागरिकांचा या योजनेला प्रचंड प्रतिसाद लाभला असून अत्यंत उत्साहात कार्यक्रम पार पडला.

नाशिक शहरातील विविध भागात राष्ट्रवादी युवक काँग्रेसच्या वतीने सदरचा उपक्रम लवकरच राबविण्यात येणार असल्याचे अंबादास खैरे यांनी सांगितले. या कार्यक्रमास श्रमिक सेनेचे बाळासाहेब पाठक यांचे सौजन्य लाभले. यावेळी दीपक पाटील, संदीप गांगुर्डे, संदीप खैरे, सागर तांबे, राम शिंदे, राज रंधवा, पप्पू शिंदे, विनायक जाधव, जयदीप सोळंकी, कौस्तुभ जथे, अमर गोसावी, रोहित जाधव, शुभम पाटील, हेमंत दळवी, सचिन अहिरे आदींसह मोठ्या संख्येने परिसरात महिला व नागरिक उपस्थित होते.

गोविंदनगर येथील पुलावर संरक्षक जाळी बसविण्याचे काम सुरू

शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनचे यश

नाशिक श्र प्रतिनिधी

शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्ष व सत्कार्य फाउंडेशनच्या एक वर्षाच्या सततच्या पाठपुराव्याला यश आले आहे. गोविंदनगर येथील डेटामॅटिक्सजवळील पुलावर दोन्ही बाजूला महापालिकेतर्फे संरक्षक जाळी बसविण्याच्या कामाला गुरुवारपासून सुरुवात झाली आहे. नागरिकांच्या सुरक्षेसह नंदिनी नदीचे प्रदूषण कमी होण्याला यामुळे मदत होणार आहे.

डेटामॅटिक्सजवळ मुंबई नाका येथे नंदिनी नदीवरील या पुलावर संरक्षक जाळ्या बसवाव्या, अशी मागणी सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख) यांच्या पुढाकाराने प्रभाग २४ मधील नागरिकांनी निवेदनाद्वारे केली होती. महापालिकेच्या गोदावरी संवर्धन विभागाच्या 'गोदावरी साफसफाई संबंधित इतर विकासकामे' या सदरातून यासाठी निधी मंजूर करण्यात आला. बाबासाहेब गायकवाड (देशमुख) यांनी तत्कालीन आयुक्त, गोदावरी संवर्धन कक्षाचे उपायुक्त, तसेच बांधकामचे शहर अभियंता यांची वेळोवेळी भेट घेवून प्रस्तावास मान्यता मिळवून घेतली. निविदा निघाल्यानंतर अंतिम प्रशासकीय मंजुरी व काम सुरू करण्याचा आदेश निघेपर्यंत पाठपुरावा केला. काम त्वरित सुरू करावे यासाठी सुद्धा निवेदन दिले. काल गुरुवारी, ५ ऑक्टोबरपासून या कामाला सुरुवात झाली आहे. यामुळे नंदिनी नदीत घाण, कचरा टाकण्यास प्रतिबंध होणार असून नागरिकांच्या जीविताचेही रक्षण होणार आहे. सत्कार्य फाउंडेशनचे अध्यक्ष बाबासाहेब गायकवाड (देशमुख), शिवसेना कार्यकर्त्या चारुशीला गायकवाड (देशमुख), बाळासाहेब मिंधे, मयुर आहेर, धवल खैरनार, संगिता देशमुख, प्रभाकर खैरनार, रवींद्र सोनजे, संध्या छाया ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष विठ्ठलराव देवरे, गोविंदनगर ज्येष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष भालचंद्र रत्नपारखी, विनोद पोळ, निलेश ठाकूर, प्रकाश दुसाने, संकेत कुलकर्णी, चिन्मय वराडे, गोरख नेरे, विजय उपाध्ये, नीलेश येवला, दिलीप निकम, बापूराव पाटील, डॉ. शशीकांत मोरे, भारती देशमुख, उज्ज्वला सोनजे, वंदना पाटील, अशोक पाटील, बाळासाहेब राऊतराय, बाळासाहेब देशमुख, राजेंद्र कानडे, मनोज वाणी, दीपक दुट्टे, सचिन राणे यांच्यासह प्रभाग २४ मधील नागरिकांनी महापालिकेचे आभार मानले आहेत.

यापूर्वी दोंदे पुलावर केले काम

शिवसेना, सत्कार्य फाउंडेशनच्या प्रयत्नाने यापूर्वी म्हसोबा महाराज मंदिराजवळील दोंदे पूल तसेच सिटी सेंटर सिग्नलकडून गोविंदनगरकडे जाणार्या रस्त्यावरील पुलावर मागील वर्षी संरक्षक जाळ्या बसविण्यात आल्या आहेत.

क्षयरुग्ण शोध मोहिमेचे आयोजन

धुळे । शहराल ग्रामीण भागात ३ ते १३ ऑक्टोंबर या कालावधीत क्षयरुग्ण शोध मोहीम राबविण्यात येणार असल्याची माहिती जिल्हा क्षयरोग अधिकारी डॉ. सोनिया बागडे यांनी दिली आहे. या मोहिमेतंर्गत जिल्ह्यात ग्रामीण भागातील १ लाख ९० हजार १७६६ नागरिकांची घरोघरी जाऊन तपासणी केली जाईल.

केंद्रीय मंत्री डॉ.भारती पवारांच्या बंगल्यावर गोंधळ घालणाऱ्या चौघांवर गुन्हा दाखल

नाशिक । प्रतिनिधी

केंद्रीय आरोग्य राज्यमंत्री डॉ. भारती पवार यांच्या नाशिक येथील बंगल्याच्या आवारात चौघांनी आरडाओरडा करून सुरक्षारक्षक पोलीस तसेच मंत्री पवार यांच्या सचिवांच्या शासकीय कामात अडथळा निर्माण करून आंदोलन करण्याची धमकी दिल्याबद्दल गंगापूर पोलीस ठाण्यात एका वकिलासह चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, ही घटना मंगळवार (दि. ०३ ऑक्टोबर २०२३) रोजी दुपारी पावणे दोन वाजेच्या सुमारास केंद्रीय मंत्री डॉ. भारती पवार यांच्या राहत्या घरी बंगला क्रमांक ५०७ आनंदनगर, भारत गॅस गोडाऊन जवळ, गंगापूर रोड नाशिक येथे बंगल्याच्या आवारातील कार्यालयात घडली. याप्रकरणी अश्विनी धर्मराज कनोज (वय २७, रा. गणगौरव अपार्टमें,ट पांडव नगरी, इंदिरानगर, नाशिक) यांनी गंगापूर पोलीस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. त्यानुसार ड. अल्का शेळवके (मोरे पाटील) व एक महिला व दोन पुरुष (नाव गाव पत्ता माहीत नाही) अशा चौघांविरुद्ध गंगापूर पोलीस ठाण्यात शासकीय कामात अडथळा आणल्याप्रकरणी व इतर कलमांनुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मंत्री डॉ. भारती पवार यांची पत्रकार परिषद सुरु असताना या चौघांनी संगनमत करून कार्यालयात राडा केला होता.

शेतकऱ्यांना भरपाई, जनतेला आनंदाचा शिधा देणारे संवेदनशील सरकार

भाजपा महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांनी केले सरकारचे अभिनंदन

नाशिक । प्रतिनिधी

जून-जुलै महिन्यातील पूर, अतिवृष्टीमुळे पिके व शेतजमिनींचे नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी राज्य सरकारने तात्काळ १,०७१ कोटींचा निधी मंजूर केला आहे. तर आनंदाचा शिधा वाटपात पोहे आणि मैद्याचा समावेश झाल्याने सामान्य कुटुंबांचे दिवाळीचे दिवस अधिक आनंदाचे होणार आहेत, अशी भावना भाजपाचे महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांनी पत्रकाद्वारे व्यक्त केली.

जनतेच्या हितासाठी संवेदनशील असलेल्या महायुती सरकारचे भाजपा अभिनंदन करत आहे, असेही त्यांनी पत्रकात म्हटले आहे. यंदाच्या दिवाळीनिमित्त वितरित होणाऱ्या आनंदाच्या शिधा संचात रवा, चणाडाळ, साखर व खाद्यतेलासोबत मैदा आणि पोहे यांचाही समावेश करण्यात आला. शिधा पत्रिकाधारकांना १०० रुपयात १ किलो साखर,१ लिटर खाद्यतेल, प्रत्येकी अर्धा किलो रवा, चनाडाळ, मैदा आणि पोहे असा शिधा २५ ऑक्टोबर ते ३० नोव्हेंबरपर्यंत वितरित करण्यात येणार आहे. तर आनंदाचा शिधा वाटपात पोहे आणि मैद्याचा समावेश झाल्याने सामान्य कुटुंबांचे दिवाळीचे दिवस अधिक आनंदाचे होणार आहेत, अशी भावना भाजपाचे महानगर अध्यक्ष प्रशांत जाधव यांनी पत्रकाद्वारे व्यक्त केली. महायुती सरकारच्या या निर्णयामुळे राज्यातील सणासुदीचे दिवस गोड होणार असून आपत्तीग्रस्त बळीराजालाही दिलासा मिळणार आहे, असे प्रशांत जाधव यांनी प्रसिद्धी पत्रकात म्हटले आहे.

राज्यस्तरीय थलेटिक स्पर्धेत व्ही डी के स्पोर्ट्स फाउंडेशनचे खेळाडू चमकले



नाशिक । प्रतिनीधी

रत्नागिरी जिल्ह्यातील चिपळूण येथे ३७ व्या महाराष्ट्र जुनिअर थलेटिक राज्यस्तरीय स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते, स्पर्धेमध्ये नाशिकची वीडीके स्पोर्ट्स फाउंडेशन ची खेळाडू स्वरा ब्राह्मणकर हिने १६ वर्षाखालील ८०० मीटर धावणे या प्रकारात आपला बेस्ट परफॉर्मन्स (२:२५:८०) देत रौप्य पदक मिळवले त्याचबरोबर ४ १०० रिले धावणे या प्रकारात दिशा देवगिरे, स्वरा ब्राम्हणकर व वैष्णवी ने रौप्य पदक संपादन केले. स्वराच्या या वैयक्तिक कौशल्याच्या यशाने आगामी १७ ते १९ ऑक्टोबर कालावधीत राजस्थान राज्यातील कोटा येथे होणाऱ्या पश्चिम विभागीय अथलेटिक चॅम्पियनशिप साठी निवड करण्यात आली. तिच्या या यशाने व्हि डि के स्पोर्ट्स फाउंडेशन व नाशिक जिल्ह्याचे नाव लौकिक झाले या यशामागे नाशिक जिल्हा थलेटिक्स असोसिएशनचे चेअरमन हेमंत पांडे व सेक्रेटरी सुनील तावरगिरी यांचे सहकार्य लाभले. त्याचबरोबर व्हि डी के स्पोर्ट्स फाउंडेशन चे मार्गदर्शक बाळासाहेब शिरफुले व वैजनाथ काळे यांच्या मार्गदर्शनाखाली धावपटूंना यश संपादन करता आले. राजस्थान येथे होणाऱ्या आगामी स्पर्धे तही स्वरा ब्राह्मणकर असेच यश प्राप्त करेल अशी खात्री मार्गदर्शक बाळासाहेब शिरफुले यांनी बाळगली. सी एम सी एस कॉलेजचे प्राचार्य डॉ. रवींद्र पाटील यांनी विजेत्या खेळाडू व मार्गदर्शकांचे अभिनंदन केले व आगामी स्पर्धेसाठी शुभेच्छा दिल्या.

ॲड.एस.डी.पाटील
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर सो. यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज क्र. ११५९/२०२३

१. निंबाबाई जिभाऊ देवरे(पाटील), वगैरे ...**अर्जदार**

।। विरुध्द ।।

निरंक ... **जाबदेणार**

कै. जिभाऊ भोजू देवरे(पाटील) ...**मयत**

ज्याअर्थी अर्जदारांनी धुळे येथील मे.दिवाणी न्यायाधीश, कनिष्ठ स्तर कोर्ट क्र.३ सो.धुळे यांचेकडे दिनांक २७/०९/२०२३ रोजी अर्जदार यांनी कि.दि. अर्ज क्र.११५९/२०२३ चा अर्ज कै. जिभाऊ भोजू देवरे(पाटील) यांचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदार यांना मयतांचे शासकीय व निमशासकीय कामासाठी मे.न्यायालयातून अर्जदार हे मयताचे कायदेशीर वारस असल्याबाबत वारस दाखला मिळणेकामी सदरचा अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे.न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता पुढील चौ.दि.०२/११/२०२३ हि निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधितांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश क.स्तर कोर्ट नं.३ सो, धुळे यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहून हरकत नोंदवावी. त्याअर्थी मे.कोर्टाने दिलेल्या व निश्चित तारखेपर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारींची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण : धुळे
दि.२९/०९/२०२३ आदेशावरुन

कामगीरी कारकून **अधिक्षक**
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, धुळे (शिक्का) **दिवाणी न्यायाधीश, क.स्तर, धुळे**

प्रोसेस जमा ॲड. प्रफुल्ल सी. चित्ते, धुळे
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथिल मे. दिवाणी न्यायाधीशा सो. व.स्तर यांचे कोर्टात

दि. कि. अर्ज नं. १०५०/२०२३

अमोल सुरेश बोरसे, वगैरे ...**अर्जदार**

।। विरुध्द ।।

कोणीही नाही ... **जाबदेणार**

कै. सुनंदाबाई सुरेश बोरसे ...**मयत**

ज्याअर्थी दि.२८/०८/२०२३ रोजी सदरचा अर्ज दाखल केला आहे. त्याअर्थी वरील अर्जदार हे मयत कै.सुनंदाबाई सुरेश बोरसे यांचे कायदेशीर वारस आहेत. मौजे फागणे, ता.जि.धुळे हद्दीतील गट क्र. व उपविभाग नं ४०२/१/ब/५ क्षेत्र ०.८७५० आर चौ.मी. यासंदर्भात वारस दाखला (हेअरशीप सर्टीफिकेट) मिळावा म्हणून सदरचा अर्ज धुळे न्यायालयात दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरीता चौकशी तारीख २१/११/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारसांना व इतर संबंधितांना या जाहिर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, याबाबत कोणास काही वाद, हरकत असल्याने धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. क.स्तर क्र.३ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पूर्वी उपस्थित राहुन तक्रार करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणाचीही तक्रार उपस्थित न झाल्यास सदरकामी कोणाचीही, काहीही हरकत नाही असे गृहीत धरण्यात येवून सदर अर्जाचे कामकाज पूर्ण करण्यात येईल. त्यानंतर तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही. सदर नोटीस मे. न्यायालयाच्या सही-शिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

धुळे
दिनांक : ०४/१०/२०२३

कामगीरी कारकून **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे (शिक्का) **दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे**

ॲड. राजेश नंदलाल अग्रवाल
निशाणी नं.- ६

जाहिर नोटीस

धुळे येथिल मे. २ रे सह दिवाणी न्यायाधीशा सो. व.स्तर यांचे कोर्टात

दिवाणी किरकोळ अर्ज नं. ११६५/२०२३

श्रीमती. अरूणा नंदकिशोर भराडीया वै. ...**अर्जदार**

।। विरुध्द ।।

कै. नंदकिशोर हिरालालजी भराडीया (मयत) ...**मयत**

ज्याअर्थी की, अर्जदार नं. १ अरुणा नंदकिशोर भराडीया ह्या कै. नंदकिशोर हिरालालजी भराडीया यांची पत्नी आहे तर अर्जदार नं. २. खुशबू अंकुर भक्कड हि कै. नंदकिशोर हिरालालजी भराडीया यांची मुलगी आहे. कै. नंदकिशोर हिरालालजी भराडीया यांचे दि. २०/४/२०२३ रोजी मौजे पुणे येथे निधन झालेले आहे. कै. नंदकिशोर हिरालालजी भराडीया यांच्या नावावर असलेल्या १. मौजे धुळे-२ ता. जि. धुळे येथील सि.स.नं./नगरभूमापन क्रं. १०१ (फायनल प्लॉट नं. १०१) चे क्षेत्र ९६४०.५८ चौ. मी. ची मिळकत.

२. मौजे धुळे-२ ता.जि. धुळे येथील सि.स.नं. / नगरभूमापन क्रं. ९९ (फायनल प्लॉट नं. ९९) चे क्षेत्र ११९००.१२ चौ.मी. ची मिळकत.

३. मौजे धुळे- २ ता. जि. धुळे येथील सि. स.नं. / नगरभूमापन क्रं. २८३४ (फायनल प्लॉट नं. २८३४) चे क्षेत्र ८४.४० चौ.मी.ची मिळकत.

४. मौजे गोंदुर ता. जि. धुळे येथील स.नं. २३९/२/ब/१ चे क्षेत्र १.०९, पी.ख. ०. ११ ची शेत मिळकत.

५. मौजे महिंदळे ता.जि. धुळे येथील स.नं. ३७/अ/१/१ पैकी प्लॉट नं. ५ चे क्षेत्र १५० चौ.मी.ची मिळकत.

६. मौजे महिंदळे ता. जि. धुळे येथील स.नं. ३७/अ/१/१ पैकी प्लॉट नं. ६ चे क्षेत्र १५० चौ.मी.ची मिळकत.

७. मौजे महिंदळे ता.जि. धुळे येथील स.नं. ३७/अ/१/१ पैकी प्लॉट नं. ७ चे क्षेत्र १५० चौ.मी.ची मिळकत.

८. मौजे महिंदळे ता.जि. धुळे येथील स.नं. ३७/अ/१/१ पैकी प्लॉट नं. ८ चे क्षेत्र १५० चौ.मी.ची मिळकत.

९. मौजे तिखी ता.जि. धुळे येथील गट. कं. १३९/२ चे क्षेत्र ०.३५.००, पो.ख ०.०८.०० ची शेत मिळकत.

१०. मौजे भुसावळ जि. जळगाव येथील सि.स.नं./नगरभुमापन क्रं. १२०८ चे क्षेत्र ८४.. ४० चौ.मी.ची मिळकत.

११.मौजे शिंदी ता. भुसावळ जि. जळगाव येथील स.नं./भुमापन क्रं. २०८ चे क्षेत्र ०. ९४.५०, पो.ख. ०.०३.५० ची शेत मिळकत.

१२.मौजे भुसावळ जि. जळगाव येथील सि.स.नं./नगरभुमापन कं. १३४४ चे क्षेत्र ३५.१० चौ.मी.ची मिळकतं..

१३.मौजे भुसावळ जि.जळगाव येथील सि.स.नं./नगरभुमापन कं. ११२५ चे क्षेत्र ११५. ४० चौ.मी.ची मिळकत.

१४. मौजे भुसावळ जि.जळगाव येथील सि.स.नं./नगरभूमापन क्रं./फायनल प्लॉट कं. २०० पैकी प्लॉट नं. ५९ ची मिळकत (मामाजी टॉकीज) नावाने प्रसिध्द असलेली मिळकत. यावर भोगवटदार सदरी अर्जदार यांची नावे लावण्याकरीता वारस दाखला मिळण्याकरीता अर्जदारने बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ अन्वये हेअरशिप सर्टीफीकेट मिळण्याकरीता या मे. कोर्टात अर्ज केलेला आहे. आणि

ज्याअर्थी की, सदर अर्जाचे कामकाज दि. ०६/११/२०२३ रोजी मे, कोटीत चौकशी कामी नेमलेले आहे.

त्याअर्थी की, सदर अर्जास कोणाचीही काहीही हरकत असल्यास वा कोणत्याही प्रकारे विरोध असल्यास, त्यांनी स्वतः किंवा त्यांचे कायदेशीर प्रतिनीधी वा वकीलांमार्फत सदर नोटीस प्रसिध्द झालेपासून ३० दिवसांच्या आंत आपले म्हणणे सादर करावे, अन्यथा कोणाचे काहीही म्हणणे नाही, हरकत नाही असे समजून योग्य तो आदेश पारीत केला जाईल यांची नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस असे.

धुळे
दिनांक - ०४/१०/२०२३ आदेशावरून

कामगीरी कारकून **अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे (शिक्का) **दिवाणी न्यायालय, व.स्तर, धुळे**

न्यूज कॉलम

माजी सैनिकांनी भरती प्रक्रियेचा लाभ घ्यावा

धुळे । धुळे व नंदुरबार जिल्ह्यातील ५० वर्षापेक्षा कमी वय असलेल्या माजी सैनिकांसाठी १३६ इन्फंट्री बंटालियन (टीए) इको, महार मध्ये नोकरी करण्याची संधी उपलब्ध झाली आहे. त्याकरिता १०९ इन्फंट्री बंटालियन (टीए) मराठा लाईट कोल्हापूर (महाराष्ट्र) येथे १७ ऑक्टोंबर ते २० ऑक्टोंबर २०२३ या कालावधीत भरती प्रक्रिया सुरु होणार आहे. यासाठी माजी सैनिकाकरीता वैद्यकीय पात्रता शेप-१ व सेवानिवृत्ती वेळी चारित्र्य चांगले असलेल्या इच्छुक व पात्र माजी सैनिकांनी संपुर्ण माहितीसह शुक्रवार, दि.१३ ऑक्टोंबर, २०२३ पर्यंत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय,धुळे येथे प्रत्यक्ष संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी मेजर डॉ.निलेश पाटील यांनी एका प्रसिद्धी पत्रकान्वये केले आहे.

चालकास मारहाण; दोघांवर गुन्हा

धुळे । रस्त्यात उभी अॅपेरिक्षा बाजूला घे, असे सांगितल्याच्या रागातून दत्तू काशीनाथ माळी या वाहनचालकास गावातील अमृत भावराव कोळी याने लोखंडी रॉडने मारून जखमी केले. तसेच कल्पेश अमृत कोळी याने हाताबुक्क्यांनी मारहाण केली. शिवीगाळ करत धमकी दिली. २७ सप्टेंबरला रात्री साडेदहाच्या सुमारास हा प्रकार घडला. याबाबत दत्तू माळी यांच्या फिर्यादीवरून सोनगीर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला.

वरूळ येथील आरोग्य केंद्र नुतन इमारत रुग्णसेवेच्या प्रतीक्षेत

वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांची नेमणूक अद्याप झालेली नाही

वरुळ । प्रतिनिधी

शिरपूर तालुक्यातील पाच कोटी रुपये खर्चुन वरुळ येथे उभारण्यात आलेल्या नुतन प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची इमारत उभी राहुन जवळपास तीन वर्षे उलटत आले तरी अद्याप आरोग्य प्रशासनाने अधिकारी - कर्मचाऱ्यांची नियुक्ती करून रुग्णसेवेस प्रारंभ न केल्याने नागरिकांची परवड होऊन ही इमारत केवळ शोभेची 'वास्तु' ठरली आहे.

ग्रामीण व दुर्गम भागातील रुग्णांची परवड लक्षात घेऊन तीन वर्षापूर्वी वरूळ (ता.शिरपुर) येथे माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ तुषार रंधे, व आमदार काशिराम पावरा ग्रामपंचायती च्या पुढाकाराने प्राथमिक आरोग्य उपकेंद्रास मान्यता मिळून इमारत उभारण्यासाठी पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध झाला होता. सन २०२० मध्ये वरूळ येथे रस्त्यावर गावालगतच शासकीय गायरान जमिनीवर नुतन प्राथमिक आरोग्य उपकेंद्राची आकर्षक इमारत उभी राहिली. या उपकेंद्राशी त-हाडीसह वरुळ, भटाणे, जवखेडा, त-हाडकसबे, अभानपुर, जळोद, ममाणे, नवे -जुने लोढरे, नवे,-जुने, अंतुली, ही गावे संलग्न करून जवळपास पंधरा हजार लोकसंख्ये च्या आरोग्याची जबाबदारी या उपकेंद्रावर सोपविण्याचे ठरविण्यात आले. अभानपुरसह नवे -जुने लोढरे, नवे,-जुने अंतुली,त-हाडकसबे जळोद सटीपाणी ही गावे मुख्य रस्त्यापासून दूर असल्याने हेनुतन उपकेंद्र त्यांचेसाठी लाभदायक ठरणार होते. परिसरात इमारतीचे काम सुरु झाल्याचे समजताच गावांत उपचार मिळण्याच्या अपेक्षेने प्रत्येकांच्या चेहर्यावर आनंद ओसंडून वाहत होता. परंतु वास्तु उभारली जाऊन तीन वर्षाचा काळ होत आला तरी अद्याप आरोग्य प्रशासनाने ही इमारत ताब्यात घेतली नाही. एवढेच नव्हे तर या उपकेंद्रास मंजूरी मिळून वास्तु उभारली गेल्याचा व जागा भरण्याचा आरोग्य विभागास विसर पडल्याने परिसरातील नागरिकांच्या नशीबी थट्टाच आली आहे.

पाच कोटी रुपये खर्चून उभारण्यात आलेली ही इमारत तीन वर्षानंतरही उदघाटनाच्या प्रतिक्षेत असून या इमारतीमध्ये वैद्यकिय अधिकारी, परिचारीका कक्षासह उपचार कक्ष त्यांच्या निवासस्थाना ची व्यवस्था, स्वच्छतागृह, पाण्याची व्यवस्था करण्यात आली आहे.मात्र अडीच ते तीन वर्षाच्या प्रदीर्घ कालावधीनंतर सुद्धा या आरोग्यवर्धिनी उपकेंद्र उद्घघाटनाच्या मुर्हूताअभावी शोभेची वास्तू म्हणून उभी आहे. या इमारतीचे लोकार्पण करण्याची ग्रामपंचायतीच्या वतीने पूर्णतः तयारी करण्यात येवून माजी शालेय शिक्षण मंत्री अमरिश पटेल, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष डॉ तुषार रंधे, 'तथा' शिरपूर विधानसभा आमदार काशिराम पावरा यांच्या हस्ते लोकार्पण होणार असल्याच्या कोनशिलाही बसविण्यात आल्या. एवढेच नव्हे तर इमारतीच्या प्रथमदर्शनी भागात लोकर्पणाचे फलकही रंगविण्यात आले. मात्र आरोग्य प्रशासन सुस्त असल्याने कोणतीच प्रक्रिया पूर्ण करण्यात आली नाही.या परिसरातील नागरिकांना केवळ नवीन इमारतीचे आकर्षण लागून राहिले. आता या इमारतीच्या सभोवताली गवत व झाडे झुडपे उगवली आहेत.

संरक्षण भिंतींचे काम अपूर्णच

प्राथमिक आरोग्य केंद्र गावाबाहेरील नदीकाठी बांधण्यात आले आहे. या आरोग्य केंद्रासाठी संरक्षण भिंतींचे काम करते गरजेचे आहे. सर्व सोयी सुविधासह असणाऱ्या या आरोग्य केंद्राच्या फक्त दर्शनी भागात प्रवेशद्वार बांधण्यात आले आहे. मात्र संरक्षण भिंत नसल्याने खेळासाठी यां दवाखान्याचा वापर होत आहे. १५ मार्च २०२२ ला संरक्षण भिंत बांधकामांचे अध्यादेश असुन पंधरा दिवसांत बांधकाम झाल्याचे दर्शविण्यात आले आहे. परंतु या कामाचे फलकदेखील धुळखात पडुन आहे.

तालुक्यात वरूळ येथे प्राथमिक आरोग्य केंद्र नवीन मंजुर झाले आहे. त्याठिकाणी नागरिकांना चांगल्या आरोग्य सुविधा मिळाव्यात यासाठी वैद्यकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांच्या नेमणुक होणं गरजेचं आहे. सध्या अपुर्ण कर्मचारी असल्याने सेवा देण्यासाठी अडचण येत आहे येत्या काही दिवसांत वरील कार्यवाही होण्यासाठी जिल्हा स्तरावर मागणी करण्यात आली आहे

- डॉ.प्रसन्ना कुलकर्णी
(तालुका आरोग्य अधिकारी, शिरपूर)

मंजुर पदे

प्राथमिक आरोग्य उपकेंद्रात दोन वैद्यकीय अधिकारी, एक लॅब टेक्निशियन, चार शिपाई, एक आरोग्य सहाय्यक,दोन नर्स एक फार्मासिस्ट पदे मजूर झाली आहेत.

सत्यशोधक पद्धतीने विवाहबंधनात

पिंपळनेर । प्रतिनिधी

ना.मंडप,ना. मुहूर्त,ना. हुंडा,ना. वाजंत्री, ना. मिरवणूक,ना पुरोहित, सत्यशोधक राष्ट्रपिता- महात्मा ज्योतिबा फुलेच्या सत्यशोधक विचारांनी प्रेरीत होऊन. पिंपळनेर येथे अनंतचतुर्थीला दोन समाजातील दोन दिव्यांगांनी सत्यशोधक पद्धतीने विवाह करून समाजात नवा आदर्श निर्माण केला.या निर्णयाचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे.

पिंपळनेर येथील सगरवंशीय जिरेमाळी समाजातील रविंद्र नारायण पगारे यांची दिव्यांग कन्या कु. छाया रविंद्र पगारे (आंगणवाडी शिक्षीका) हिला पहाण्यासाठी, फागणे, ह.मु.साक्री येथिल कै.भटू बाबुराव पाटील यांचे चि० व दिनेश भटु पाटील यांचे बंधू चि. जितेंद्र भटु पाटील हे अनंत चतुर्थीला पिंपळनेर आले. दोन्ही पक्षाकारांनी वधू-वर पसंतीचा कार्यक्रम झाला. व लगेचच दोघांनी विवाह बंधनाचा निर्णय घेतला. या साठी मुलीचे वडील रविंद्र पगारे, आई भिमाबाई पगारे, काका रामकृष्ण पगारे, डॉ गोविंद पगारे, भाऊ चेतन पगारे, मामा डीगंबर साळवे, जावाई महेश नंदन यांनी व मुलाचे बंधू दिनेश भटु पाटील मुलाची आई श्रीमती मंदाकीनी भटु पाटील, यांनीही लगेच होकार दिला.सायंकाळी घरातच वरास टोपी, टॉवेल,कपडे व श्री फळ देऊन, लगेच दोन बोट हळदी दोघांना लाउन, वधुसही वराकडील मंडळीने शगुनचे स्नेह वस्र (साडी)आणले. वधूसही लागली हळद यावेळी सत्यशोधक विधीकर्ते सत्यशोधक जेष्ठ पत्रकार सुभाष जगताप यांनी दोन्ही वर व वधुस सत्यशोधक विचार सांगून दोघांनी यशस्वी जीवन जगण्याचा मंत्र देऊन विधीवत विवाह वरमाला टाकुन समाजात या दोन दिव्यांग वधू-वरांनी समाजा पुढे नविन आदर्श निर्माण केला तर मंगलाष्टक ह.भ.प. विजय महाजन काळे पाटील यांनी म्हटले. व दोघांना शुभाशिर्वाद दीले, या आदर्श विवाहास माजी जि.प. सदस्य ऑड झागेश्वर एखंडे, माजी सरपंच शिलनाथ एखंडे, मोहन संपतराव पाटील,भा.ज.पा.चे मंडल सचीव रामकृष्ण एखंडे, शामकांत सुपडू पगारे ,महेश पांडुरंग नंदन, गिरिष प्रमोद पगारे, पाडुरंग सिताराम नंदन, डॉ.ज्ञानेश्वर पगारे, संजय साळवे, डॉ. राजेंद्र पगारे, सुरेश पाटील, श्रावण गावित, व घराती महिला वर्ग उपस्थित होत्या . या आदर्श सत्यशोधक विचारांच्या सत्यशोधक विवाहाचे समाजातून स्वागत केले जात आहे.

मनपातील अधिकारी, कर्मचारी यांनी घेतली स्वच्छतेची शपथ

नाशिक । प्रतिनिधी

स्वच्छ भारत अभियानांतर्गत नाशिक महापालिकेच्या वतीने मनपा मुख्यालय राजीव गांधी भवन येथे स्वच्छतेची शपथ जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी उपस्थित अधिकारी कर्मचारी यांना दिली.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत सध्या स्वच्छता पंधरवडा राबविण्यात येत आहे. २ ऑक्टोबरला महात्मा गांधी जयंतीच्या औचित्याने त्याची सांगता होणार आहे. या पंधरवड्यानिमित्त क्वालिटी सिटी नाशिक अभियानांतर्गत स्वच्छते संदर्भात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. मनपा मुख्यालय राजीव गांधी भवनातील स्वागत कक्ष येथे अधिकारी व कर्मचारी यांनी सामूहिकरीत्या स्वच्छतेची शपथ घेतली. यावेळी कार्यक्रमास उपायुक्त डॉ. विजयकुमार मुंडे, प्रशांत पाटील, नितीन नेर, घनकचरा व्यवस्थापन संचालक डॉ.आवेश पलोड, आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.तानाजी चव्हाण, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.प्रमोद सोनवणे, मुख्य लेखा परीक्षक प्रतिभा मोरे, शिक्षण अधिकारी बी. टी. पाटील, कार्यकारी अभियंता नितीन पाटील, राजेंद्र शिंदे, उपअभियंता कुलकर्णी, सहाय्यक वैद्यकीय अधिकारी डॉ.अजिता साळुंखे, नाना साळवे, नितीन गंभीरे, सचिन बोरसे, हुसेन पठाण आदींसह अधिकारी कर्मचारी उपस्थित होते. सूत्रसंचालन जनसंपर्क अधिकारी योगेश कमोद यांनी केले तर उपस्थितांचे आभार उपायुक्त प्रशांत पाटील यांनी केले.

जागतिक हृदय दिन

जागतिक हृदय दिनानिमित्त मनपा मुख्यालय राजीव गांधी भवन स्वागत कक्ष येथे हृदयाची काळजी घेणे बाबत आरोग्य वैद्यकीय अधिकारी डॉ.तानाजी चव्हाण यांनी सविस्तर माहिती देऊन हृदयाची काळजी घेणे बाबत आवाहन केले. तर स्वच्छतेची शपथ उपक्रमाबाबत शाळा स्तरावर केलेल्या नियोजनाबाबत शिक्षणाधिकारी बी.टी.पाटील यांनी माहिती दिली. तसेच अविरल गोदावरी उपक्रम दि.२ ऑक्टोबर रोजी राबविण्यात येणार आहे. यानिमित्त रामकुंड पंचवटी गोदातिरी कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती उपायुक्त डॉ.विजयकुमार मुंडे यांनी दिली.

डॉ. अनस अन्सारी यांची अखिल भारतीय समुदाय आरोग्य अधिकारी संघटना अध्यक्षपदी निवड

जैताणे । प्रतिनिधी

ऑल इंडिया असोसिएशन ऑफ कम्युनिटी हेल्थ ऑफिसर्स या राष्ट्रीय प्रशासकीय मंडळाने २४ सप्टेंबर २०२३ रोजी झूम प्लॅटफॉर्मचा वापर करून त्यांची बैठक आयोजित करण्यात आली होती.

या आभासी मेळाव्याने देशभरातील समर्पित समुदाय आरोग्य अधिकाऱ्यांना एकत्र आणले. एकमताने डॉ. अनस अन्सारी यांची अखिल भारतीय समुदाय आरोग्य अधिकारी संघटनाच्या अध्यक्षपदी निवड करण्यात आली. याव्यतिरिक्त भारताच्या विविध क्षेत्रांवर देखरेख करण्यासाठी राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्षांची नियुक्ती करण्यात आली. विविध महत्त्वाच्या भूमिका स्वीकारल्या. भविष्यातील कार्यक्रमांमध्ये निष्क्रिय सदस्यांचा समावेश करायचा की नाही यावर कोअर कमिटी लवकरच चर्चा करेल असे आव्हान केले. यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्र जैताणे चे डॉ. अनस अन्सारी यांची अखिल भारतीय समुदाय आरोग्य अधिकारी संघटना च्या सर्वच्या एका अनुमतीने अध्यक्षपदी निवड करण्यात आली. म्हणून प्राथमिक आरोग्य केंद्र जैताणे चे वैद्यकीय अधिकारी डॉ आकाश गावित. डॉ गायत्री अहिरे प्राथमिक आरोग्य केंद्राचे सर्व कर्मचाऱ्यांनी पुढील वाटचालीसाठी खूप खूप शुभेच्छा दिल्या.

धुळे जिल्ह्यात आयुष्यमान भव मोहिमेचा प्रारंभ

धुळे । प्रतिनिधी

समाजातील सर्व घटकांपर्यंत आरोग्य सेवा पोहचवून आरोग्याच्या सोयीसुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी केंद्र शासनाची महत्वकांक्षी आयुष्यमान भव मोहिम धुळे जिल्ह्यात १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर २०२३ या कालावधीत राबविण्यात येत आहे.

आयुष्यमान भव अभियानांतर्गत आरोग्य मेळाव्याचा शुभारंभ शनिवार २३ सप्टेंबर,२०२३ रोजी सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र, शहरी दवाखाने, ग्रामीण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालयाच्या ठिकाणी धुळे जिल्हा अंतर्गत चार तालुक्यातील स्थानिक मा. खासदार, मा. आमदार मा. अध्यक्ष जि.प.धुळे, मा. उपाअध्यक्ष मा. सभापती, सरपंच महोदय, ग्रामपंचायत सदस्य, सामाजीक सहकार शैक्षणिक क्षेत्रातील प्रतिष्ठीत नेते, अधिकारी तसेच कर्मचारी व लोक प्रतिनिधीच्या प्रमुख उपस्थितीत धुळे जिल्हयात सर्वत्र पार पडले.

कार्यक्षेत्रातील भेटी प्रसंगी जिल्हास्तरीय तसेच तालुकास्तरावरील अधिकारी वर्ग यांच्या माध्यमातुन यशस्वी पर्यवेक्षण प्लान व सुक्ष्म कृती आराखडा नियोजन उत्तम रितीने करण्यात आलेले आहे. सदर अधिकारी व कर्मचारी प्रत्येक शनिवारी सर्व प्राथमिक आरोग्य केंद्र, उपकेंद्र शहरी दवाखाने, ग्रामिण रुग्णालय, उपजिल्हा रुग्णालय इ. ठिकाणी भेटी देणार आहे. व सदर मेळावे चांगल्या रितीने होतील जास्तीत जास्त लाभार्थी सहभाग घेतील याप्रमाणे नियोजन करण्यात आले आहे. या मोहिमे अंतर्गत प्रधानमंत्री जन आरोग्य योजना आयुष्यमान भारत गोल्डन कार्ड, स्वच्छता अभियान दर शनिवारी विविध कार्यक्रमा संबंधी मेळावे घेणे, अवयव दान जनजागृती करणे, रक्तदान शिबिर घेणे, दिनांक २ ऑक्टोंबर रोजी सर्व ग्रामपंचायतीमध्ये आयुष्यमान सभा आयोजीत करणे, अंगणवाडी प्राथमिक शाळामधील ० ते १८ वर्ष मुलांची आरोग्य तपासणी करणे सेवा सप्ताह साजरा करणे, सिकलसेल तपासणी करणे, क्षयरोग तपासणी करणे, कुठरोग तपासणी करणे, १८ वर्षावरील सर्व पुरुषांचे सर्वेकष आरोग्य तपासणी करणे, निमित्त उच्च रक्तदाब मधुमेह इ. आजारावरील आरोग्य तपासणी करणे इ. कार्यक्रम घेवून आयुष्यमान भव मोहिम राबविण्यात येत आहे. धुळे जिल्ह्यातील ग्रामीण तसेच शहरी भागातील सर्व आरोग्य संस्था अंतर्गत १०३९०५ नागरिकांना आरोग्य सेवा पुरविण्यात आली. आयुष्यमान भव मोहिमेअंतर्गत अवयवदानाची दिशा समितीच्या बैठकीत शपथ घेण्यात आली. सभेला मा. खा. सुभाषजी भामरे, मा. खा. हिना गावीत, मा. अध्यक्ष जिल्हा परिषद श्रीमती अश्विनी पवार, मा. जिल्हाधिकारी अभिनव गोयल, मा. जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी श्री शुभम गुप्ता, मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी चंद्रकांत पवार, मा. जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. सचिन बोडके, मा. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. डि. एन. देगांवकर, मा. अतिरिक्त जिल्हाशल्यचिकित्सक डॉ. स्वप्नील पाटील, मा. जिल्हा माता बाल संगोपन अधिकारी डॉ. तरन्नुम पटेल, मा. सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. संजय मोरे, मा. जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्रीमती अमिता आठवले, कृष्णाली शिंदे व जिल्ह्यातील सर्व तालुका आरोग्य अधिकारी तसेच अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पांढऱ्या सोन्यावर 'लाल्या', रोगाचा प्रादुर्भाव

शेतकरी वर्ग हवालदिल बळीराजा संकटात

चिमठाणे । प्रमोद शिंपी

ह्या वर्षी पाऊसाच्या अनियमित पणामुळे कापसाच्या उत्पन्नात मोठी घट येण्याची शक्यता आहे. आगस्ट महिन्यात पाऊसाचा एकवीस दिवस खंड पडल्याने पिकांची वाढ खुंटली व बहुतेक पिकावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव झाल्याने उत्पन्नात फारच घट दिसून येत आहे. खर्च व उत्पन्ना चा विचाराने शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आहे अश्या बिकट अवस्थेत शेतकरी वर्ग हतबल झाला आहे.

- ए. एस. गिरासे (शेतकरी)

या वर्षी शेतकरी संकटात सापडले आहेत. पाऊस कमी प्रमाणात पडल्यामुळे कापसाचे उत्पन्न ५० टक्के कमी झाले आहे. त्याचबरोबर कापसावर लाल्या रोग आल्यामुळे शेतकरी हतबल झाले आहे. यावर्षी बियाणे,खते,औषधीआणि मजुरी वाल्यामुळे शेतकरी खूप त्रस्त झाले आहेत. आर्थिक संकटात सापडला आहे.

- राहुल संभाजी पाटील (शेतकरी)

शिंदखेडा तालुका सह चिमठाणे परिसरात शेतकऱ्यांनी मोठया प्रमाणात कापसाची लागवड केली आहे. निव्वळ ह्याच आशेवर की ह्या वर्षी पावसाळा चांगल्या स्वरूपाचा राहील परंतु ज्या शेतकऱ्यांची पाण्याची सोय होती त्यांनी मे महिन्यात लागवड केली परंतु जे शेतकरी पाऊसाच्या पाण्यावर अवलंबून होते त्यांची लागवड जुलै महिन्यात झाली कारण पाऊस तुरळक झाल्याने कोरळवाहू शेतकरी वर्ग संकटात सापडला आहे.

पाऊसाने दडी मारल्याने मे महिन्याची लागवड झालेल्या कापसावर लाल्या रोगाने ग्रासले या रोगामुळे कापूस पूर्णपणे लाल होत असून पाने कोरडे होत आहेत. पान गळ होत आहे. या रोगामुळे फळधारणा देखील वाढण्याची शक्यता नाही. जेव्हडी बोंड आहे तेवढेच कापूस निघणार आहे.परिणामी उत्पन्न पन्नास टक्यावर येईल या विचाराने शेतकरी वर्ग आर्थिक संकटात असून शेती मशागती साठी लागलेला खर्च देखील निघणार नाही. पिक करपल्या मुळे पिकाची मोठी हानी झाली आहे.

या विचाराने शेतकऱ्याचे कंबरडे मोडले आहे. म्हणून शासनाने त्वरित पंचनामे करून या मदत करावी अशी मागणी देखील शेतकरी करीत आहेत. व कोरड वाहू शेतकरी मात्र एकाच विचारात आहे की कापसाची वाढ होईल केव्हा व उत्पन्न येईल केव्हा अश्या संकटात शेतकरी सापडला आहे. बियाणे, खते, किटकनाशके, शेतीची मशागत, मजुरी यावर मोठा खर्च झालेला आहे. आता पाऊस नसल्यामुळे दुसऱ्यांदा पेरणी करायची झाल्यास, शासनानेच आर्थिक मदत द्यावी, अशी मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

पतंजली परीवारातर्फे शिरपूर बस स्थानकात स्वच्छता

शिरपूर । स्वामी रामदेव व आचार्य बालकुष्ण महाराज, पतंजली योगपिठ हरीव्दार यांच्या निर्देशेनुसार शिरपूर बस स्थानकात स्वच्छता अभियानाचा कार्यक्रम घेण्यात आला. यावेळी प्रमुख मनोज पाटिल, पतंजली युवाभारत जिल्हा प्रभारी जितेंद्र शेटे, भारत स्वाभिमान तालुका प्रभारी किशोर गुरव, योगगुरुजी भरत कदम, पतंजली योग समिती तालुका प्रभारी भगवान ठाकुर, किसान पंचायत तालुका प्रभारी सुनिल गुरव, प्रभारी मनोज अटवाल, राजेंद्र चौधरी,जयपाल पंजवाणी, मनोज बाबा पाटिल, दिनेश शिपी, काका गुजर, आदींची उपस्थिती होती.

घर विकणे आहे

चार रुम, आरसीसी बांधकाम सर्व सोयींनीयुक्त असलेले घर विकणे आहे. पत्ता: अंबिका मित्र मंडळ, बडगुजर प्लॉट, पारोळा रोड, धुळे

: संपर्क :

Mo. 81779 29477

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

साठीनंतर ज्येष्ठांनी वेदनाशामक औषधे टाळावेत : डॉ. गुंजाळ

श्री सप्तश्रृंगी ज्येष्ठ नागरिक संघातर्फे व्याख्यान संपन्न

नाशिक ।
वयाच्या साठीनंतर शरीरातील स्नायू आणि अवयवांची झीज होते. त्यामुळे पाठदुखी, कंबरदुखी, मानदुखी, गुडघेदुखी, हातापायांना मुंग्या येणे, संधीवात व तत्सम आजार उद्भवतात. त्यावर जास्त प्रमाणात पेनकिलर घेऊ नये. त्यामुळे आपल्या किडनीवर वाईट परिणाम होतो किंवा लगेच ऑपरेशन हा उपाय नसून ज्येष्ठांनी तज्ञ डॉक्टरांचा सल्ला घ्यावा किंवा हलके व्यायाम करावेत असा सल्ला नाशिक पेन क्लिनीकचे मणकेविकार तज्ञ डॉ. विशाल गुंजाळ यांनी दिला. सातपूर येथील श्री सप्तश्रृंगी ज्येष्ठ नागरिक संघाच्या वतीने जागतिक ज्येष्ठ नागरिक दिनानिमित्त आयोजित व्याख्यान कार्यक्रमाप्रसंगी डॉ. गुंजाळ बोलत होते. यावेळी व्यासपीठावर संघाचे अध्यक्ष किसनराव खताळे, शांताराम जमदाडे, प्रकाश महाजन, लोकज्योतीचे जितेंद्र येवले, प्रकाश घ्यार, शांताराम पाटील, हिराबाई सोनवणे उपस्थित होते. यावेळी महिलांनी व सदस्यांनी विविध आजार व समस्यांचे निराकरण याविषयी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत डॉ. गुंजाळ यांनी व्यायामाचे हलके प्रकार सांगितले. मणके विकार टाळायचे असल्यास आता ऑपरेशनची गरज नाही. प्रगत तंत्रज्ञान व संशोधनामुळे इंजेक्शन व औषधोपचारामुळेही मणकेविकाराचा त्रास टाळता येणे शक्य झाले आहे. त्यामुळे कुठलेही दुखणे अंगावर काढण्याऐवजी डॉक्टरांचा सल्ला घेणे गरजेचे असल्याचेही त्यांनी यावेळी सांगितले. यावेळी रंगनाथ आंधळे, पंढरीनाथ गायखे, चंद्रकांत निर्वाण, भगवान ठाकूर, संध्या देवरे यांनी विशेष परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रकाश महाजन यांनी केले तर आभार शांताराम जमदाडे यांनी मानले.

दैनिक
लक्ष महाराष्ट्र

अस्वच्छता, अपुरा औषधसाठा व बंद मशिनरी

हिरे रुग्णालयात राष्ट्रवादीचे आंदोलन

धुळे। ठाण्यातील कळवा रुग्णालयाप्रमाणेच नांदेड, छत्रपती संभाजीनगर, नागपूरसह राज्यातील इतर अनेक शासकीय रुग्णालयांमध्ये रुग्णांचा मृत्यू होण्याच्या घटना घडत आहेत. यास जबाबदार असलेले राज्याचे आरोग्यमंत्री व वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी करत आज राष्ट्रवादी काँग्रेसतर्फे हिरे शासकीय रुग्णालयात आंदोलन करण्यात आले. यावेळी रुग्णालयात पहाणी करुन तेथील अस्वच्छता, अपुर्ण औषधसाठा, बंद यंत्रसामग्री या विरोधात संताप व्यक्त केला. यावेळी रुग्णायाचे अधिष्ठाता यांना विविध मागण्यांचे निवेदनही देण्यात आले. त्यात म्हटले आहे की, राज्यातील आरोग्य यंत्रणेच्या भोंगळ कारभाराला सरकार जबाबदार आहे. सत्ताधीशांना जनतेच्या जीवाची पर्वा नाही. निष्पाप रुग्णांचा बळी गेल्याप्रकरणी राज्याचे आरोग्य मंत्री व वैद्यकीय शिक्षण मंत्री यांनी राजीनामा द्यावा. धुळ्यातील हिरे वैद्यकीय महाविद्यालय हे धुळे शहराबाहेरील प्रशस्त जागेत स्थलांतरीत झाल्यानंतर सुपर स्पेशलिटी सारख्या आणि पदव्युत्तराचे विद्यार्थी आल्यानंतर अधिक सुविधा रुग्णांना मिळतील अशी लोकांना अपेक्षा होती. परंतु, हे केवळ रेफर सेंटर ठरले आहे.तरी या समस्यांची तातडीने सोडवणूक करावी, अन्यथा अधिकार्यांना काम करू देणार नाही, असा इशाराही यावेळी देण्यात आला. याप्रसंगी शहर जिल्हाध्यक्ष रणजीत भोसले, उषा पाटील, राजू डोमाळे, भिका नेरकर, डी. टी. पाटील, डॉमिनिक मलबारी, हाजी हासिम कुरेशी, असलम खाटीक, मनोज कोळेकर, मंगलदास वाघ, राजेश तिवारी, जयदीप बागल, समद शेख, चेतन पाटील, आकाश बैसाणे, मंगलदास वाघ, विश्वजीत देसले, गोलू नागमल, वैभव पाटील, विशाल भामरे, नजीर शेख, अभिजित देवरे, राजू मशाल, विशाल बोरसे, मसूद शेख आदी पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

संकलन : दिपक वाघ